अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.00 । अंक १७४ । मंगळवार ७ एप्रिल २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## सहज योग एक जिवंत क्रिया

**'सहजयोग' भाग ११**



सहजयोग ही जिवंत क्रिया आहे. जिवंत क्रियेत आणि कृत्रिम क्रियेत फार अंतर असतं. जिवंत क्रियेत कोणती गोष्ट कशी घडेल ते सांगता येत नाही. म्हणजे आता एखादं झाड जर तुम्ही लावलं, त्याला कुठे फांदी फुटेल, कुठे फुलं येतील, कधी येतील, कशी उमलतील, किती फळें येतील? ते काही आधी सांगता येत नाही. परत ते दिसायचं नाही काही, सकाळी उठले फुलं आली. एखाद्या दिवशी सकाळी उठले फळं झाली. तसं सहजयोगाचं आहे. आधी पार व्हायचं. म्हणजे तुमचे कोंब फुटले. पार झाल्यावर, आता काय काय होतंय आमच्या आतून ते बघत रहायचं, साक्षी स्वरूपात. त्यासाठी पोषक काय करावे लागेल, तेवढं करत जायचं आणि ते करण्यासाठी शक्ती येते माणसामध्ये. म्हणजे आता मी कधीही प्रोग्रॅमच्या आधी म्हणत नाही की तुम्ही दारू पिऊ नका, की सिगरेट पिऊ नका, की हे करू नका, वगैरे कधीही म्हणत नाही. सहजयोग झाल्यावर मग म्हणते. कारण त्याच्याआधी तुम्हाला शक्ती नसते. विल पॉवर तेवढी नसते तुम्हाला. सकाळी ठरवतील हे करणार नाही आणि तेच हमखास होईल. ते समजतं आईला. पण पार झाल्यावर इतकी आतून शक्ती येते, आपोआपच, शक्तीपेक्षा काय, की चित्तच इतकं वेगळं होऊन जातं, की तिकडे लक्षच जात नाही. मनुष्य शांत होतो नुसता आनंदात. त्यामुळे दुसरीकडे काही लक्ष जात नाही. लक्ष परमेश्वराकडे वेधतं आणि त्याच्या आनंदातच तुम्ही डूबत असता. दुसरं काहीही नको आणि मग सगळं आपोआप घडतं. आपोआप जे घडतं तेच जिवंत आहे. ही प्रक्रिया अगदी जिवंत आहे, हे समजलं पाहिजे

**– १० डिसेंबर १९८० साने गुरुजी विद्यालय, मुंबई**

## राहुरी पोटनिवडणूक:

# तनपुरेंची 'माघार' की 'गद्दारी'?

## पवारांची खेळी अन् कर्डिले-मोकाटे आमनेसामने!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत ऐन अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी अभूतपूर्व राजकीय भूकंप झाला आहे. शरद पवार यांचे खंदे समर्थक मानले जाणारे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी निवडणुकीतून अचानक माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. एकीकडे तनपुरेंनी मतदारसंघाच्या विकासासाठी हा निर्णय घेतल्याचे म्हटले असले, तरी जिल्ह्याच्या राजकारणात मात्र तनपुरे ईडीच्या कारवाईला घाबरले की सत्तेच्या लालसेपोटी 'गॉडफादर' पवारांपासून दुरावले? अशी चर्चा रंगली आहे.

सकाळी १० वाजेपर्यंत प्राजक्त तनपुरे हे महाविकास आघाडीचे प्रबळ उमेदवार असतील असे चित्र होते. मात्र, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी थेट तनपुरे यांच्या कार्यालयात धाव घेतली. अर्धा तास चाललेल्या या बंद दाराआड चर्चेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी तनपुरेंचे फोनवरून बोलणे करून देण्यात आले. या चर्चेनंतर तनपुरेंनी आपली तलवार म्यान केली.

तनपुरेंनी माघारीसाठी एमआयडीसी, तनपुरे कारखान्याचा 'एनसीडीसी' प्रस्ताव आणि अ‍ॅम्युनेशन पार्कचा प्रश्न अशी विकासकामांची ढाल पुढे केली असली, तरी भाजपशी झालेली ही जवळीक त्यांच्या राजकीय पुनर्वसनाच्या नव्या वाटा चोखाळणारी असल्याची चर्चा आहे.

तनपुरे लढणार नाहीत हे लक्षात आल्यावर आम्ही पर्याय म्हणून गोविंद मोकाटेंना संधी (पान ४ वर)



### पवारांची 'पॉवर' गेम: तनपुरेंवर अविश्वास, मोकाटेंना संधी!

शरद पवार यांनी तनपुरेंच्या हालचालींचा वास येताच अत्यंत सावध भूमिका घेतली होती. तनपुरेंवर पूर्ण भरवसा न ठेवता पवारांनी दोन 'एबी फॉर्म' काढले होते. जेव्हा दुपारी १ च्या सुमारास तनपुरे लढणार नाहीत हे स्पष्ट झाले, तेव्हा राष्ट्रवादीने (शरदचंद्र पवार) तातडीने शिवसेना ठाकरे गटाचे गोविंद मोकाटे यांना आपला अधिकृत उमेदवार म्हणून रिंगणात उतरवले.

### कोण आहेत गोविंद मोकाटे?



शिवसेना फुटीनंतर उद्धव ठाकरेंशी एकनिष्ठ राहिलेले गोविंद मोकाटे हे भाजपचे दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी मानले जातात. २०१२ पासून राजकारणात सक्रिय, पंचायत समिती सदस्य म्हणून कामाचा अनुभव असून नगर तालुक्यातील जेऊर गटावर त्यांचे मोठे प्राबल्य आहे. त्यांची कन्या भाग्यश्री मोकाटे या दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य राहिल्या आहेत. अजित पवारांशीही त्यांचे जुने घरगुती संबंध आहेत.

## बारामतीच्या पोटनिवडणूक:

# मोरे पिता-पुत्रांनी ठोकला पवारांविरुद्ध शड्डू!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अर्ज भरला. दुसरीकडे, काँग्रेस पक्षाने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली आहे. आपल्या वडिलांकडून काँग्रेसी विचारांचा वारसा लाभलेले आकाश मोरे हे बारामतीमधील नावाजलेले वकील आहेत. मात्र, आकाश मोरे आणि त्यांचे वडील विजयराव मोरे यांचे शरद पवार यांच्यासोबतच्या ऋणानुबंधाचा आणि नात्याचा प्रवास अत्यंत रंजक आहे. विजयराव मोरे आणि आकाश मोरे या पितापुत्रांनी लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचार केला होता. तर विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्याविरोधात शरद पवार गटाकडून लढणाऱ्या युगेंद्र पवार यांच्यासाठी प्रचार केला होता. मात्र, आता हेच मोरे पितापुत्र बारामतीच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्याविरोधात शड्डू ठोकून उभे राहिले आहेत.

काँग्रेसचे बारामतीमधील उमेदवार आकाश मोरे यांचे वडील विजयराव मोरे यांनी गेली अनेक वर्षे पवारांच्या बारामतीत काँग्रेसचे अस्तित्व अबाधित ठेवण्याच्या प्रयत्न केला. शरद पवारांच्या विरोधात समाजवादी पक्षाकडून विजयराव मोरे यांनी शरद पवारांच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढवली होती. विजयराव मोरे हे १९६७ साली समाजवादी पक्षाचे बारामती तालुक्याचे प्रचारक होते. त्यांनी १९६७ सालच्या विधानसभा निवडणुकीत एस. सी. नायडू या विडी कामगाराला शरद पवार यांच्याविरोधात रिंगणात उतरवले होते. मात्र, १९९० साली शरद पवारांनी त्यांनी काँग्रेसमध्ये घेऊन विधानपरिषदेचे आमदार केले. तरीही १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना (पान ४ वर)

### कुणालाही वाऱ्यावर सोडणार नाही



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी जाहीर सभेत भावनिक भाषण केलं. त्या म्हणाल्या, दोन महिन्यांआधी अजितदादांना गमावलं. अजितदादा आपल्यात नाही, असं आजही वाटत नाही. मला स्वप्नातही वाटलं नव्हतं, की बारामतीची पोटनिवडणुक होईल. अजितदादांनी शेवटचा श्वासही बारामतीत घेतला. बारामतीकरांकडे बघूनच मला धीर आला. बारामतीच्या प्रत्येक वास्तुला अजितदादांचा स्पर्श आहे. बारामतीची प्रतिष्ठा जराही कमी होऊ देणार नाही. अजितदादांनी मताधिक्यांचे विक्रेम मोडून काढले आहेत. ही निवडणूक नाही, अजितदादांना श्रद्धांजली वाहण्याची संधी आहे. अजितदादा शब्दाला जागणारे नेते होते. अजितदादांसाठी बारामती आईसारखी होती. बारामतीचा विकास पूर्वीसारखा वेगाने होईल. नवीन प्रकल्प, गुंतवणुकीसाठी मी प्रयत्न करेन. बारामतीमधील प्रत्येक नागरिक माझ्या कुटुंबातील सदस्य आहेत. मी तुम्हाला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही, असे आश्वासन सुनेत्रा पवार यांनी दिले.

## महत्त्वाचे..

### भारतात पहिल्यांदाच ९ पोलिसांना एकाचवेळी फाशीची शिक्षा

मदुराई : भारतात पहिल्यांदाच ९ पोलिसांना एकाचवेळी फाशीची शिक्षा देण्यात आली आहे. तामिळनाडूतील मदुराई जिल्ह्यातील एका न्यायालयाने नऊ पोलिसांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. लॉकडाऊनमध्ये वडील आणि मुलाचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला होता. या प्रकरणी ही शिक्षा ठोठावण्यात आली आहे. ही घटना सहा वर्षांपूर्वी घडली होती. लॉकडाऊनमध्ये वडील आणि मुलाचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला होता. त्यामुळे देशभरात संतापाची लाट उसळली होती. २०२० मध्ये तुतीकुडी जिल्ह्यातील साथनकुलम पोलीस ठाण्यात हा प्रकार घडला होता. पी. जयराज (वय ५१ वर्षे) आणि त्यांचा ३१ वर्षीय मुलगा जे. बेनिक्स यांना १९ जून रोजी कोविड-१९ लॉकडाऊनचे उल्लंघन केल्याबद्दल अटक करण्यात आली होती. जयराज हे मोबाई दुकानाचे मालक आहे. परवानगी दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ दुकान उघडे ठेवल्याचा आरोप करत त्यांना बेकायदेशीरपणे अटक करण्यात आली होती.

# खरात प्रकरणात 'ईडी'ची एंन्ट्री

## 'समता'बरोबरच संत नागेबाबा, राहाता पीपल्स, बुलढाणा अर्बन, स्वामी विवेकानंद पतसंस्थेत काळा पैसा?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहातातील समता आणि सिन्नरच्या जगदंबा पतसंस्थेतील कॅप्टन खरात ची मनी लॉड्रिंग समोर आल्यानंतर त्याच प्रकारे संत नागेबाबा, बुलढाणा अर्बन, राहाता पीपल्स आणि स्वामी विवेकानंद या चार पतसंस्थांत मधे खरात ने पैसे गुंतवले असल्याचे निष्पन्न झाले असून या हे रॅकेट चालवत असलेला मुख्य सुत्रधार व शिर्डीतील जमीन फसवणूक प्रकरणातील आरोपी अरविंद बावके यानेच या पतसंस्थाचा रस्ता खरात ला दाखवल्याचे उघड झाले आहे त्यामुळे या चारही पतसंस्था चालकांचे धाबे दणाणले आहे.

कालच मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात मोठी मनी लॉड्रिंग झाल्याचे कबूल केले असून हा काळा पैसा चे शोधा साठी ईडी कडे तपास सोपवला जाईल अशी घोषणा केली होती त्या नुसार चौकशी केंद्रीय सक्त वसूली संचालनालय (ईडी) ने नाशिक एसआयटी कडून दत्पर मागवल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

खरात वारस असलेल्या खात्यांची माहिती या पतसंस्थांकडे पोलिसांनी मागीतली असून खरातचा आर्थिक व्यवहार पाहणारे रमेश हिंगे यांची शिर्डी पोलिसांनी कसून चौकशी केली. या चौकशीत रमेश हिंगे व त्यांच्या भावाचे नावाने प्रत्येकी ४९ लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचे समोर आले आहे. भक्तांचे पॅन आणि आधारकार्डद्वारे खरातने कोपरगावच्या समता आणि सिन्नरच्या जगदंबा पतसंस्थेत १३२ खाती उघडली. या सर्व खात्यांना नॉमिनी म्हणून खरातचे नाव असून, त्याचेच मोबाइल नंबर लिंक आहेत. या खात्यांतून ६० ते ६२ कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. याबाबत पोलिसांनी खातेदारांकडे चौकशी केली असता खातेदारांनी खाते आपले नसल्याचे सांगत सदर रक्कमेचा अन आमचा काही संबंध नसल्याचे सांगितले आहे.

शिर्डी पोलिसांनी शनिवारी सिन्नरच्या जगदंबा पतसंस्थेच्या व्यवस्थापकाची चौकशी केली. त्यात जगदंबामधील ३२ खात्याचे आर्थिक व्यवहार खरातनेच पाहिले असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, ज्या ज्या पतसंस्थेत खरातशी संबंधित खाते आहेत, त्या खातेदार व पतसंस्था व्यवस्थापनाला पोलिसांनी (पान ४ वर)

### ईडीची एंट्री धोक्याची घंटा

**शिर्डी परिसरातील पतसंस्थामध्ये कॅप्टन खरात ने सर्वाधिक गुंतवणूक केली असल्याचे हळूहळू समोर येत आहे. कालच मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात मोठी मनी लॉड्रिंग झाल्याचे कबूल केले. हा काळा पैसा रिकव्हरीसाठी ईडीकडे तपास सोपवला जाईल अशी घोषणा केली होती. त्यानुसार चौकशी केंद्रीय सक्त वसूली संचालनालय (ईडी)ने नाशिक एसआयटी कडून दत्पर मागवल्याचे वृत्त आहे. तसे झाल्यास शिर्डी परिसरातील शेकडो प्रतिष्ठीत नागरिक जेलमध्ये जाण्याची शक्यता आहे.**

### कैलास बापू कोते व विजय कोतेंची एसआयटीकडून चौकशी



शिर्डी शहराचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते, माजी उपनगराध्यक्ष व साई निर्माण ग्रुप चे सर्वेसर्वा विजयराव कोते यांना एस आय टी ने समन्स बजावल्याने त्यांनी नाशिक येथे जात जबाब नोंदवला आहे त्यांनी त्यांच्या जबाबात त्यांचा व कॅप्टन खरात चा कसा संबंध आला यावर स्पष्टीकरण दिले असून आपलं म्हणने मांडले आहे. सदर जबाब एस आय टी ने दप्तरी नोंदवून पुढील कार्यवाहीसाठी दप्तर बंद केला आहे.



राहुरी : उमेदवारी अर्ज दाखल करताना अक्षय कर्डिले. समवेत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार मोनिका राजळे आदी. (छाया : राजेंद्र परदेशी)

# महायुतीच्या दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत कर्डिलेंच्या विजयाचा 'निर्धार'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदार संघाच्या २०२६ च्या पोटनिवडणुकीसाठी राजकीय वातावरण कमालीचे तापले असून, महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. अक्षय शिवाजी कर्डिले यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'विजयी निर्धार मेळाव्यात' महायुतीमधील सर्वच घटक पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी उपस्थिती दर्शवत अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांना एकजुटीने कामाला लागण्याचे आवाहन केले.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या सभेत बोलताना भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण म्हणाले की, अक्षय कर्डिले हे तरुण आणि तडफदार नेतृत्व असून महायुतीचे सर्व कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. ही पोटनिवडणूक केवळ एका जागेसाठी नसून विकासाच्या राजकारणाला गती देण्यासाठी आहे. पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या भाषणात विरोधकांवर जोरदार प्रहार केला. जिल्ह्याच्या विकासासाठी आणि जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी अक्षय कर्डिले यांच्यासारखा सुशिक्षित उमेदवार विधानसभेत जाणे गरजेचे आहे. महायुतीची ताकद मोठी असून विजय आपलाच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या मेळाव्याला विधान परिषदेचे सभापती प्रा. रामजी शिंदे, आ. मोनिकाताई राजळे आणि आ. संग्राम जगताप यांनी देखील संबोधित केले. अक्षय कर्डिले यांनी सामाजिक कामाच्या माध्यमातून लोकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे, त्याचा फायदा या निवडणुकीत नक्कीच होईल, असे मत व्यक्त केले. या विजयी निर्धार मेळाव्यासाठी माजी मंत्री बबनराव पाचपुते, आ. विठ्ठलराव लांघे, आ. अमोल खताळ, आ. काशिनाथ दाते, आ. सुरेश धस, भाजप प्रदेश उपाध्यक्ष कृष्णराव महाडिक, सुभाष पाटील, नगरच्या महापौर ज्योतीताई गाढे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे माजी सदस्य आणि राहुरी-नगर-पाथर्डी मतदार संघातील हजारो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केवळ १,६८८ श्रीमंतांकडे देशाच्या ५० टक्के संपत्ती!

## आर्थिक विषमतेचे विदारक 'चित्र वेल्थ ट्रॅकर इंडिया' अहवालातून उघड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** भारतातील आर्थिक विषमता दिवसेंदिवस तीव्र होत असल्याचं धक्कादायक चित्र 'वेल्थ ट्रॅकर इंडिया २०२६' या अहवालातून समोर आलं आहे. सेंटर फॉर फायनान्शिअल अकाउंटेबिलिटी (सीएफए) च्या या अहवालानुसार, देशातील अवघ्या १,६८८ अतिश्रीमंत व्यक्तींकडे सुमारे १६६ लाख कोटी रुपयांची संपत्ती आहे, जी देशाच्या एकूण जीडीपीच्या जवळपास ५० टक्के इतकी आहे.

हा अहवाल 'टॅक्स द टॉप' मोहिमेअंतर्गत १ एप्रिल २०२६ रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये देशातील संपत्तीचे वितरण अत्यंत असंतुलित असल्याचं स्पष्टपणे नमूद करण्यात आले. ही परिस्थिती काही प्रमाणात औपनिवेशिक काळातील आर्थिक विषमतेची आठवण करून देणारी असल्याचंही अहवालात म्हटले आहे.




अहवालानुसार, देशातील टॉप १ टक्के लोकांकडे ४० टक्क्यांहून अधिक संपत्ती आहे. तर खालच्या ५० टक्के लोकांकडे एकूण उत्पन्नाच्या फक्त १५ टक्के हिस्सा आहे. यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत असल्याचं चित्र स्पष्ट होत आहे. २०१९ ते २०२५ या कालावधीत उच्चवर्गीयांच्या संपत्तीत मोठी वाढ झाली, मात्र खालच्या स्तरातील लोकांच्या आर्थिक स्थितीत फारसा बदल झालेला नाही. या काळात १००० कोटींपेक्षा जास्त संपत्ती असणाऱ्यांची संख्या ७७ टक्क्यांनी वाढली आहे. त्यांच्या एकूण संपत्तीतही ३१ लाख कोटींवरून ८८ लाख कोटींपर्यंत म्हणजेच सुमारे २२७ टक्क्यांची वाढ झाली आहे. देशातील प्रमुख उद्योगपतींच्या संपत्तीतही मोठी वाढ झाली आहे. मुकेश अंबानी, गौतम अदानी, सावित्री जिंदाल, सुनील मित्तल, आणि शिव नाडार या उद्योगपतींच्या एकत्रित संपत्तीत २०१९ ते २०२५ दरम्यान तब्बल ४०० टक्क्यांची वाढ झाली आहे. एकीकडे देशाची अर्थव्यवस्था वाढत असली, तरी संपत्तीतील वाढती दरी ही गंभीर चिंता बनली आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी ठोस धोरणांची गरज असल्याचं या अहवालातून अधोरेखित झालं आहे.

### श्रीमंतांवर कर वाढवण्याचा सल्ला

**अहवालात अत्यंत श्रीमंतांवर प्रोग्रेसिव्ह वेल्थ टॅक्स लावण्याची शिफारस करण्यात आली आहे. सीएफए च्या मते, सर्वात श्रीमंत १,६८८ कुटुंबांवर २ ते ६ टक्के वेल्थ टॅक्स आणि एक-तृतीयांश इनहेरिटन्स टॅक्स लागू केल्यास दरवर्षी सुमारे १०.६३ लाख कोटी रुपये सरकारला मिळू शकतात. ही रक्कम सामाजिक योजनांवर खर्च केल्यास गरीब वर्गाला मोठा दिलासा मिळू शकतो आणि आर्थिक विषमता कमी करण्यास मदत होऊ शकते.**

# जैन धर्माने अल्पसंख्यांक दर्जा सोडावा

## मंत्री लोढा यांचे विधान अज्ञानमूलक : ललित गांधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** जैन धर्म हा हिंदू संस्कृतीचा भाग आहे. त्याने अल्पसंख्याक दर्जा सोडण्याचा विचार करावा, हे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे विधान अज्ञानमूलक आहे. किंवा ते ठरवून आखलेल्या भूमिकेचा भाग आहे, अशी टीका अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष, जैन अल्पसंख्यक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सोमवारी येथे केली.

मंत्री लोढा यांच्या या विधानावर प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या पत्रकात गांधी यांनी म्हटले आहे की, जैन धर्म हा भारतातील एक स्वतंत्र, प्राचीन आणि वैज्ञानिक तत्त्वज्ञान आहे. त्याचे स्वतःचे तीर्थंकर, स्वतःची तत्त्वमीमांसा आणि मोक्षपरंपरा आहे. आम्ही हिंदू संस्कृतीचे पालनकर्ते आहोत, परंतु शाखा किंवा उपशाखा नाही. धर्म आणि संस्कृती या पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत! अल्पसंख्याक दर्जा हा कोणतीही भीक नसून आमचा घटनात्मक अधिकार आहे. तो आमच्या वेगळ्या ओळखीचा सन्मान आहे. हा दर्जा सोडणे म्हणजे स्वतःच्या अस्तित्वालाच नाकारणे होय. हा दर्जा जैन समाजाच्या ऐक्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. जैन समाज आता शांत बसणार नाही हे लोढा यांनी समजून घ्यावे, असा इशारा गांधी यांनी दिला आहे.

## संपादकीय

# तनपुरेंची 'शरणगती' आणि बदललेली राजकीय समीकरणे!

अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात 'धक्कातंत्र' हे काही नवीन नाही, परंतु राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने जे घडले, त्याने केवळ जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे राजकारण हादरवून सोडले आहे. शरद पवार यांचे खंदे समर्थक, तरुण नेतृत्व आणि महाविकास आघाडीचे प्रबळ दावेदार मानले जाणारे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी घेतलेली माघार, हा केवळ एक राजकीय निर्णय नसून तो एका मोठ्या 'पडद्यामागच्या' खेळीचा परिपाक आहे. या निर्णयामुळे आता राहुरीचा रणांगण 'कर्डिले विरुद्ध मोकाटे' असा रंगला असला, तरी या संपूर्ण प्रकरणाचे पडसाद आगामी अनेक वर्षे उमटत राहणार आहेत.

या संपूर्ण नाट्याचे सूत्रधार म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाहिले जात आहे. विखे पाटील यांनी गेल्या काही काळापासून जिल्ह्यात आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करण्याचा विडा उचलला आहे. पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्यासमोर तनपुरे यांचे मोठे आव्हान होते. हे आव्हान मैदानात उतरून परतवण्यापेक्षा, ते मैदानात उतरण्यापूर्वीच संपवणे, यालाच 'विखे-पॅटर्न' म्हटले जाते.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि विखे पाटील यांनी थेट तनपुरे यांच्या कार्यालयात जाऊन केलेली चर्चा आणि त्यानंतर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेला संवाद, हे सर्व नियोजित 'धक्कातंत्रा'चा भाग होते. तनपुरेंच्या माघारीमुळे विखे पाटील यांनी केवळ भाजपचा मार्ग सुकर केला असे नाही, तर शरद पवारांच्या बालेकिल्ल्यात सुरुंग लावून आपली राजकीय ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

प्राजक्त तनपुरे यांनी आपल्या माघारीचे समर्थन करताना राहुरी तालुक्यातील प्रलंबित प्रश्न, मुळा धरण, तनपुरे कारखाना आणि एमआयडीसीचे कारण पुढे केले आहे. मात्र, राजकीय विश्लेषकांच्या मते, यामागे केवळ विकासकामे नसून 'विवशता' अधिक दिसते. ईडीसारख्या केंद्रीय यंत्रणांचा दबाव किंवा सत्तेच्या माध्यमातून आपल्या संस्था वाचवण्याचा प्रयत्न, या चर्चांना आता उधाण आले आहे. ज्या शरद पवारांनी तनपुरेंना मंत्रिपद दिले, कठीण काळात साथ दिली, त्या 'गॉडफादर'पासून दुरावणे तनपुरेंना परवडणारे आहे का? हा प्रश्न अनुत्तरित आहे. जर केवळ विकासकामांसाठी ही माघार असेल, तर मग गेल्या अडीच वर्षांत हे प्रश्न का सुटले नाहीत? असा सवाल आता सामान्य मतदार विचारत आहे. तनपुरेंच्या या निर्णयामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये मोठी नाराजी असून, ही नाराजी मतदानातून कशी व्यक्त होईल, यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून असेल.तनपुरेंनी माघार घेतल्यावर शरद पवारांनी टाकलेली 'गोविंद मोकाटे' ही खेळी अत्यंत मोजकी आणि टोकदार आहे. गोविंद मोकाटे हे भाजपचे दिवंगत नेते शिवाजी कर्डिले यांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी राहिले आहेत. नगर तालुक्यातील जेऊर गटातील हे जुने राजकीय वैमनस्य आता राहुरीच्या पोटनिवडणुकीत केंद्रस्थानी आले आहे.

वडिलांचा वारसा आणि सहानुभूतीची लाट त्यांच्या बाजूने आहे. तसेच भाजपची मोठी संघटनात्मक ताकद आणि विखेंचे पाठबळ त्यांना लाभले आहे. मोकाटे हे 'लढाऊ' नेते म्हणून ओळखले जातात. शिवसेना (ठाकरे गट) आणि आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा 'एबी फॉर्म' मिळाल्याने त्यांना महाविकास आघाडीची ताकद मिळाली आहे. कर्डिलेंना त्यांच्याच बालेकिल्ल्यात (नगर तालुका भाग) घेरण्याची क्षमता मोकाटेंकडे आहे.

सुरुवातीला ही निवडणूक 'महायुती विरुद्ध तनपुरे' अशी वैयक्तिक पातळीवर वाटत होती. मात्र, आता ती 'महायुती विरुद्ध महाविकास आघाडी' अशा अधिकृत संघर्षात रूपांतरित झाली आहे. ही निवडणूक विखे पाटील यांच्या प्रतिष्ठेची आहे. तनपुरेंना बसवून त्यांनी अर्धी लढाई जिंकली असली, तरी मोकाटेंचे आव्हान कमी लेखणे महागात पडू शकते. शरद पवारांनी मोकाटेंना उमेदवारी देऊन हे स्पष्ट केले आहे की, ते सहजासहजी मैदान सोडणार नाहीत. निष्ठावान कार्यकर्त्यांना संदेश देण्यासाठी ही निवडणूक जिंकणे पवारांसाठी गरजेचे आहे. राहुरीच्या या राजकीय नाट्यात लोकशाहीच्या मूल्यांपेक्षा 'राजकीय सोय' अधिक वरचढ ठरल्याचे दिसते. प्राजक्त तनपुरेंनी मांडलेले प्रश्न, मग ते ॲम्युनेशन पार्कचे असो वा कारखान्याचे, हे खरोखरच सुटणार का? की ही केवळ निवडणुकीपुरती दिलेली आश्वासने आहेत? हे येणारा काळच ठरवेल. शासनाने आणि निवडणूक आयोगाने या पोटनिवडणुकीत सत्तेचा किंवा यंत्रणांचा गैरवापर होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. मतदारांनीही उमेदवाराच्या चेहऱ्यापेक्षा, विकासाच्या मुद्द्यांवर आणि राजकीय नीतिमत्तेवर आधारित मतदान करणे गरजेचे आहे. राहुरीची ही पोटनिवडणूक केवळ एक आमदार निवडण्यासाठी नाही, तर ती जिल्ह्याच्या भविष्यातील राजकारणाची दिशा ठरवणारी 'नांदी' ठरणार आहे. 'पावर' विरुद्ध 'पवार' या लढाईत राहुरीचा सामान्य मतदार कोणाच्या पाठीशी उभा राहतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# वडाळा महादेव येथे आज रेणुकादेवी जन्मोत्सव दशकपूर्ती सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री क्षेत्र रेणुकादेवी आश्रमात चैत्र वद्य पंचमी अर्थात आज मंगळवार दि ७ एप्रिल २०२६ रोजी श्री रेणुकादेवी जन्मोत्सव दशकपूर्ती सोहळा आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्य विश्वस्त मातोश्री नलिनीदेवी जोशी यांनी दिली आहे. आश्रमाचे संस्थापक मौनयोगी सदगुरू रेवणनाथ महाराज यांच्या आज्ञेनुसार व श्री रेणुका महात्म या ग्रंथातील प्रमाणानूसार चैत्रातील वद्य पक्षातील पंचमी या दिवशी रेणुराजा व माता भोगावतीच्या ऊदरी रेणुका देवीचा जन्म झालेला आहे. या दिवशी सकाळी राजराजेश्वरी रेणुका देवी अभिषेक महापूजा व द्राक्ष फळ अर्चन पूजा होणार आहे. तसेच त्यानंतर रामकृष्णनगर महिला भजनी मंडळाचे भगवती भजन होणार आहे. ११ वाजून ११ मिनिटांनी पंचोपचार, मंत्रअक्षत व शांतीसुक्त पठण , जन्म पाळणा गायन होईल माध्यन नैवेद्य आरती नंतर तांबुल प्रसाद वितरण होणार आहे. भगवती रेणुका जन्मोत्सव निमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री रेणुका ऊपासना परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# रोजगार सहाय्यकांचे कामबंद आंदोलन; मनरेगा कामांवर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :**अहिल्यानगर जिल्ह्यातील रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिलपासून कामबंद आंदोलन पुकारल्याने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) सुरू असलेली अनेक कामे ठप्प झाली आहेत. घरकुल, विहीर, शेळीपालन शेड, वृक्ष लागवड यांसारख्या विविध योजनांवर याचा परिणाम झाला आहे.

रोजगार सहाय्यकांनी आरोप केला आहे की, काही ठिकाणी ग्रामस्थ प्रत्यक्ष कामावर नसतानाही सकाळी ७ ते ७.३० दरम्यान ऑनलाइन पद्धतीने चुकीचे फोटो अपलोड करून हजेरी लावली जात आहे. विशेषतः राहाता तालुक्यातील लोणी व संगमनेर परिसरातील वन विभागाच्या कामांमध्ये असे प्रकार सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणात कामगार प्रत्यक्ष उपस्थित असतात की नाही, याबाबत शंका व्यक्त केली जात असून आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच या सर्व प्रक्रियेची जबाबदारी रोजगार सहाय्यकांवर टाकली जात असल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी व रोजगार सहाय्यकांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# आज वरखेडमध्ये श्री लक्ष्मी देवी यात्रा

## सीसीटीव्ही निगराणीखाली सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नेवासा तालुक्यातील वरखेडच्या श्री लक्ष्मी देवीची मंगळवारी ७ एप्रिल २०२६ रोजी यात्रा भरत असून यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली असून भाविकांच्या स्वागतासाठी वरखेडनगरी सज्ज झाली असून यंदा यात्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी १६ सीसीटीव्ही कमेरे मंदिर परिसरात लावण्यात आले असल्याचे देवस्थानचे गोरे यांनी सांगितले.

सोमवार दि.०६ एप्रिल रोजी रात्री ०८:३० वा. होम कार्यक्रम होणार असून मंगळवार दि.७ एप्रिल रोजी मुख्य यात्रा आयोजित करण्यात आली आहे. मंगळवार यात्रेनिमित्त छबीना व प्रेक्षणीय शोभेचे दारुकाम होणार



असून नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी सर्व पोलीस यंत्रणा बंदोबस्तासाठी सज्ज केली आहे.

यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,आरोग्य सुविधा,यात्रेकरूंसाठी निवारा,दुकानासाठी जागा उपलब्ध करण्यात आली आहे.

मंगळवार दि. ७ एप्रिल रोजी यात्रेनिमित्त सकाळी ११ वाजता पैठण येथुन कहार व भोई समाजाने आणलेल्या पालखीची पुजा ट्रस्टी व गावकरी यांच्या वतीने करण्यात येईल यात्रेनिमित्त परिसरातील तालुक्यातील डेपो तून जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष कडू पाटील गोरे यांनी सांगितले

श्री लक्ष्मी देवीच्या यात्रेनिमित्त भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री लक्ष्मी देवी ट्रस्टचे अध्यक्ष कडू पाटील गोरे, उपाध्यक्ष लक्षाधिश दाणे, सचिव राजु शिरसाठ, सह सचिव रंगनाथ पवार, खजिनदार रावसाहेब कुंढारे, विश्वस्त रामदास गोरे,सुरेश हारदे, नवनाथ वाघ, रामचंद्र कुंढारे, किशोर शिरसाठ, सुरेश शिरसाठ, भगवान जगधने, देविदास शिरसाठ, बाळासाहेब आश्रु शिरसाठ यांनी केले आहे.

# गुरु हे भक्तांना परमेश्वराशी एकरुप करतात : महंत राधाकृष्ण महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेल्या अहिल्यानगर येथील गुरुदत्त भक्तीधाम देवस्थानला राजस्थान जोधपूर येथील गोवत्स राधाकृष्ण महाराज यांनी सदिच्छा भेट दिले. गुरु हे भक्तांना परमेश्वराशी एकरुप करतात त्यामुळे गुरूंच्या सानिध्यात राहून परमेश्वराची भक्ती करा असे आवाहन महंत राधाकृष्ण महाराज यांनी यावेळी बोलताना केले. अहिल्यानगर येथील ३ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत नंदनवन लॉन्स न्यू टिळक रोड येथे रामनिवास सतीशचंद्र इंदाणी यांनी भक्तांसाठी दुपारी २ ते ६ यावेळेत जोधपूर येथील प.पू. गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद भागवत कथेचे आयोजन केले आहे. त्यानिमित्ताने संत किसनगिरीनगर येथील गुरुदत्त भक्तीधाम येथे प.पू.गोवत्स राधाकृष्ण महाराज यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी देवगड देवस्थानचे महंत गुरुवर्य महंत भास्करगिरी महाराज यांनी त्यांचे स्वागत केले.याप्रसंगी संतांचा अनोखा मिलाप पहावयास मिळाला.उपस्थित भाविकांनी प्रवचनाचा लाभ घेतला.



# माजी सैनिक संघर्ष समितीच्या बैठकीत

## विरांगणा महिला बचत गटाची स्थापना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील माजी सैनिक संघर्ष समितीची बैठकित माजी सैनिक महिला बचत गटाची स्थापना करण्यात येऊन या नवीन बचत गटाला विरांगणा महिला बचत गट असे नाव देण्यात आले असून या बचत गटाच्या अध्यक्ष म्हणून सुवर्णा दत्तात्रय दरेकर, सचिव म्हणून वैशाली बद्रीनाथ देशमुख व खजिनदार गितांजली रवींद्र कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.

श्रीरामपूर तालुक्यातील माजी सैनिक संघर्ष समितीची बैठक खेळीमेळीच्या वातावरणात उत्साहात पार पडली. यात प्रारंभी मागील बैठकीचे इतिवृत्त व संघटनेचा जमा खर्च संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मेजर सुधाकर हरदास यांनी वाचून दाखवला. बैठकीमध्ये जय माजी सैनिक पाल्यांना राज्य व केंद्र शासनाच्या वतीने शैक्षणिक कालावधीत मिळत असलेल्या चिल्ड्रन एज्युकेशन अलाउन्स आणि शिष्यवृत्ती बाबत वेळेपुर्वी लागु असलेले कागदपत्र जमा करणे, सैनिकी सर्व कागदपत्रांमध्ये पत्नीचे मुलांचे व आपले सैनिकांचे संपूर्ण नांव जन्म दिनांकांची नोंद या आहे की नाही त्याची शहनिशा करून दुरुस्ती करून घेणे, विधवा पत्नींना ज्या सुविधा लागू आहेत त्या मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून मदत करणे, दिवंगत माजी सैनिकांच्या पत्नींस फॅमिली पेन्शन मिळणे कामी लागत असलेले सर्व कागदपत्रांबद्दल माहिती देऊन मदत करणे आदी महत्वपूर्ण निर्णय घेण्याबाबत चर्चा करण्यात आली.

केंद्र व राज्य तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून मिळत असलेल्या अनुदानाबाबत मेजर कृष्णा सरदार यांनी माहिती दिली. याप्रसंगी संघटनेचे माजी सैनिक परिवारातील सर्व सदस्यांसमवेत मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन मेजर कृष्णा सरदार यांनी तर आभार प्रतिक्षा भागडे हिने केले.

# गॅस टंचाईविरोधात श्रीरामपुरात संताप

## तहसीलसमोर वंचितचे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** – घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा, पुरवठ्यातील अनियमितता आणि एजन्सींच्या मनमानीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने श्रीरामपूर तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. डॉ. गौतम चित्ते यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात नागरिकांनी केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात संताप व्यक्त केला.

देशभर सुरू असलेल्या गॅस टंचाईमुळे नागरिकांना वारंवार एजन्सीच्या फेऱ्या माराव्या लागत असून, वेळेवर गॅस मिळत नसल्याने सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरावर मोठा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर महिलांसह युवक, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान मोदी सरकार हाय हाय, गॅस द्या नाहीतर खुर्ची सोडा, गरीबांच्या चुलीशी खेळ बंद करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. गॅस पुरवठा तात्काळ सुरळीत करावा, एजन्सींची चौकशी करून साठेबाजी व काळाबाजार थांबवावा, अशी




मागणी आंदोलकांनी केली.

आंदोलनानंतर शिष्टमंडळाने तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन सादर केले. मागण्या मान्य न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनात सुनील वाघमारे, वैशाली अहिरे, ओम त्रिभुवन, ॲड. अण्णासाहेब मोहन, ॲड. अमोल सोनवणे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# भाजपा हा पक्ष नव्हे, एक विचार : ना. राधाकृष्ण विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** भाजपा हा केवळ राजकीय पक्ष नसून, तो एक विचार आहे. अंत्योदय चळवळ ते विकसित भारत असा पक्षाच्या वाटचालीचा यशस्वी प्रवास जनतेच्या दृढ विश्वासाने सुरू असून, भविष्यात पक्षाचा जनाधार अधिक भक्कम होण्यासाठी कार्यकर्त्यांनी गाव पातळीवर पक्षाचा विचार पोहचविण्यासाठी काम करण्याची अपेक्षा जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.



भारतीय जनता पक्षाच्या ४६व्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करून प्रतिमा पूजन करण्यात आले.उपस्थित सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्यासह प्रवरा बॅंकेचे चेअरमन डॉ.भास्करराव खर्डे, जेष्ठ नेते किसनराव विखे, चेअरमन नंदकिशोर राठी, चेअरमन मकरंद गुणे, व्हा.चेअरमन मच्छिंद्र थेटे, सोपानराव शिरसाठ, विजयराव लगड, बाजार समितीचे संचालक राहुल धावणे, सरपंच कल्पना मैड, सुनिल जाधव, जिल्हा भाजपाच्या सौ.शोभा घोरपडे, अनिल विखे, माजी सरपंच लक्ष्मण बनसोडे, एन.डी विखे, रविंद्र धावणे, अशोक धावणे, संजय आहेर, सोपान विखे, चांगदेव विखे, दिलीप विखे यांच्यासह विविध संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की, जगातील सर्वाधिक सदस्य संख्या असलेला पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाची ओळख निर्माण झाली आहे. यामागे समर्पित भावनेन काम करणाऱ्या कार्यकत्याचे मजबूत संघटन असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख मंत्री विखे पाटील यांनी केला.

भारत देशाला सर्वोच्च स्थानावर नेण्यासाठी भाजपाने नेहमीच राष्ट्र प्रथम ही भूमिका घेवून काम केले. लोकांच्या हक्कासाठी संघर्ष आणि विकासाच्या प्रक्रीयेसाठी पक्षाचे धोरण राहील्याने ४६ वर्षाची यशस्वी वाटचाल जनतेच्या पाठबळावर अधिक मजबूत झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सलग तीनवेळा भाजपाची सत्ता येणे हे पक्षाच्या योग्य आशा राष्ट्रीय धोरणाचे, लोकाभिमुख निर्णयाची यशस्विता असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की, विकसीत भारताच्या भविष्यासाठी प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली वाटचाल देशाच्या उज्वल भवितव्याचे द्योतक आहे. 'सबका साथ सबका विकास' या मंत्राने समाजातील शेवटचा माणूस विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून निर्णय होत आहेत. राज्यात मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सलग तीन वेळा भाजपाला मिळालेले यश आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही प्रथम क्रमांकाचे मिळालेले यश हे जनतेच्या विश्वासाचे प्रतिक असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. स्थापना दिवसाच्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# घरकुलाच्या अनुदानात वाढ करा ; मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** बांधकाम साहित्य व मजुरी दरात मोठी वाढ झाल्याने शासकीय अनुदानाच्या रकमेत घरकुलाचे बांधकाम होणे शक्य नाही. सद्यस्थितीत घरकुल बांधायचे तर बांधकाम व पूरक खर्च धरुन सरासरी ५ लाखापर्यन्त खर्च येतो हे ध्यानात घेता सध्याच्या अनुदानाच्या रकमेत घरकुल बांधणे अशक्य असल्याने शासनाने अनुदानाच्या रकमेत दुप्पट वाढ करावी अशी मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे. केन्द्र शासनाकडून पंतप्रधान आवास योजनेतून घरकुले मंजूर केली जातात. यासाठी केन्द्र शासन लाभार्थ्याला रु.१ लाख २० हजार घरकुल,रु.३५ हजार बांधकाम,रु.१५ हजार सोलर, रु. २६ हजार ५०० मजुरी व रु.१२ हजार शौचालय असे एकुण २ लाख ८ हजार इतके अनुदान देते.

तथापि बांधकामासाठी आवश्यक सिमेंट, वाळू, स्टिल व मजुरी यात भरमसाठ वाढ झाल्याने अनुदानाच्या रकमेत घरकुल बांधकाम करणे सर्वसामान्य लाभार्थ्याच्या कुवतीबाहेर आहे. आजमितीस निव्वळ बांधकाम खर्च सरासरी १००० रु. चौरस फूट इतका खर्च येतो. ४००चौरस फुटाचे घरकुलाचे बांधकाम करायचे तर हा खर्च रु.४ लाखापर्यन्त जातो.या व्यतिरिक्त रंगकाम,लाईट फिटिंग व पूरक कामांसाठीचा वेगळा खर्च येतो.याचा हिशोब करता घरकुलासाठीचा खर्च सुमारे रु. ५ लाखापर्यन्त जातो. यामुळे लाभार्थ्याला अनुदानाव्यतिरिक्त रु.२ ते ३ लाखापर्यन्त स्वखर्च करावा लागणार आहे. हा खर्च सामान्य लाभार्थ्याच्या आवाक्याबाहेर असल्याने घरकुलाच्या अनुदानाच्या रकमेत दुप्पट वाढ करावी अशी मागणी घरकुल लाभार्थ्यांकडून केली जात आहे.

# पुरंदरमधील १८ शाळांच्या विकासासाठी कोट्यवधींचा निधी

## ग्रामीण शिक्षणाच्या दर्जात होणार मोठी वाढ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** पुरंदर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद पुणे यांनी महत्वाचा निर्णय घेत १८ प्राथमिक शाळांच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. जिल्हा नियोजन निधीतून या शाळांमध्ये नवीन वर्गखोल्या बांधकाम, इमारत दुरुस्ती तसेच विविध मूलभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून दुरुस्तीची प्रतीक्षा असलेल्या शाळांना दिलासा मिळणार असून विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुविधायुक्त वातावरणात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

**''समाविष्ट गावे''**

या योजनेमध्ये पुरंदर तालुक्यातील चांबळी, कोडीत खुर्द, नारायणपूर, कुंभारवळण, यादववाडी, माहूर, तोंडल, पिंपरे खुर्द, पारगाव (४ उठ), दौंडज, राख, नाझरे सुपे, कदमवस्ती, पिसर्वे, राजुरी, राजेवाडी, सोनोरी आणि जगतापवस्ती या गावांतील शाळांचा समावेश करण्यात आला आहे.

**''कोणती कामे होणार?''**

या अंतर्गत खालील कामे करण्यात येणार आहेत:

'' नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम
'' शाळा इमारतींची दुरुस्ती
'' स्वच्छतागृह बांधकाम
'' कंपाउंड वॉल
'' पिण्याच्या पाण्याच्या सुविधा




पुरंदर तालुक्यातील १८ प्राथमिक शाळांच्या विकासकामांना जिल्हा परिषद पुणे यांच्याकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ग्रामीण शिक्षणाच्या पायाभूत सुविधांना चालना मिळणार आहे. **(छायाचित्र : जिल्हा परिषद पुणे)**

'' विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित पायाभूत सुविधा
'' इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा

**'' प्रशासनाचा निर्णय ''**

या प्रस्तावाला जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजय नाईकडे यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. संबंधित कामे तांत्रिक मान्यतेनंतर लवकरच सुरू होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**''कामांवर राहणार कडक देखरेख**

कामांची गुणवत्ता राखण्यासाठी बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंते यांच्या देखरेखीखाली ही कामे केली जाणार आहेत. तसेच ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**''शिक्षणाच्या दर्जात होणार सुधारणा**

या कामांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणे सुविधा मिळणार असून शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम होणार आहे. सुरक्षित इमारती आणि चांगल्या सुविधा मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढण्याचीही अपेक्षा व्यक्त होत आहे.

**''स्थानिकांची प्रतिक्रिया''**

या निर्णयामुळे पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून अनेकांनी जिल्हा परिषदेचे आभार मानले आहेत. लवकरात लवकर कामे सुरू व्हावीत अशी मागणी देखील करण्यात येत आहे. पुरंदर तालुक्यातील शाळांच्या विकासासाठी मिळालेला हा निधी ग्रामीण शिक्षणासाठी महत्वाचा टप्पा मानला जात असून यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त होत आहे

**''अधिकाऱ्यांचे मत''**

गजानन पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे) यांनी सांगितले की, 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा देणे हे आमचे प्राधान्य आहे. सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.'' संजय नाईकडे (शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद पुणे) यांनी सांगितले की, ''या विकासकामांमुळे शाळांची भौतिक परिस्थिती सुधारेल आणि विद्यार्थ्यांना चांगले शैक्षणिक वातावरण मिळेल.''

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## कर्मवीर शंकररावजी काळे यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**कोळपेवाडी** : सहकार, शिक्षण, कृषी, सिंचन, सामाजिक व राजकीय क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा आनमोल ठसा उमटवणारे आणि रयत शिक्षण संस्थेच्या प्रसारात स्वतःला झोकून देऊन ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी गावोगावी शाळा आणि महाविद्यालयांचे जाळे विणणारे माजी खासदार कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त कोपरगाव शहरातील पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या पूर्णाकृती स्मारकास आमदार आशुतोष काळे यांनी असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे व्हा.चेअरमन छबुराव आव्हाड, कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण, कैलास ठोळे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, सतीश कृष्णानी, माजी उपसभापती मधुकर टेके, शिवाजीराव ठाकरे, डॉ.अजय गर्जे, मा.नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, हाजीमहेमूद सय्यद, जनार्दन कदम, संदिप कपिले, शैलेश साबळे, राहुल शिरसाठ, इम्तियाज अत्तार, बाळासाहेब रुईकर, विरेन बोरावके, रमेश गवळी, सुनिल शिलेदार, फकीर कुरेशी, अजीज शेख,विजय त्रिभुवन, बाळासाहेब आढाव, सुनिल बोरा, डॉ.चंद्रशेखर आव्हाड, सचिन गवारे, मनोज नरोडे, सागर आहेर, सोमनाथ आढाव, शुभम काळे, मुकुंद भूतडा, सुनिल फंड, चंद्रशेखर म्हस्के, प्रकाश दुशिंग, एकनाथ गंगुले, विजय बंब, ठकाजी लासुरे, प्रदीप कुऱ्हाडे, प्रशांत वाबळे, चांगदेव आगवण, राजेंद्र आभाळे, दिनकर खरे, विकास बेंद्रे, राजेंद्र खैरनार, सचिन परदेशी, मनोज कडू, संतोष शेलार, चंद्रकांत धोत्रे, दिनेश संत, सचिन ठोळे, भाऊसाहेब भाबड, विकास मांढरे, शुभम लासुरे, निलेश बोरुडे, गणेश बोरुडे, विकास आढाव, लक्ष्मण सताळे, सिद्धार्थ शेळके, अनिल बनसोडे, मयूर राऊत, राजेंद्र साठे, अभिषेक भाबड, रवी देवरे, प्रशांत मोरे, मयुरेश शिंदे, हारुण शेख, वैभव कानडे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रयत शिक्षण संस्थेचे प्राचार्य, मुख्याध्यापक, रयत सेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चव्हाण कुटुंबीयांना माजीमंत्री गडाख यांची सांत्वन भेट


**सोनई** – नेवासा तालुक्यातील बऱ्हाणपुर येथील ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य प्राध्यापक गणपतराव पाटिलबा चव्हाण यांच्या मातोश्री सरस्वतीबाई पाटीलबा चव्हाण यांच्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्या पार्श्वभूमीवर चव्हाण कुटुंबात सहभागी होऊन माजी मंत्री शंकररावजी गडाख यांनी एक सांत्वन्पर भेट दिली. याप्रसंगी बाभळेश्वर दूध संघांचे माजी व्हा. चेअरमन रंगनाथ रौदळ, मुळा कारखान्याचे माजी संचालक नानासाहेब रेपाळे,गोरखशानाथ चव्हाण,मुळा बँकेचे संचालक रामभाऊ कराळे, कांगोणी सोसायटीचे संचालक पोपटराव रौंदळ, पंचायत समितीचे माजी उपसभापती दिलीप लोखंडे, नेवासा तालुका विक्री खरेदी विक्री संघाचे संचालक सुभाष चव्हाण, ड. बाळासाहेब चव्हाण, छावा संघटनेचे माजी अध्यक्ष अशोक चव्हाण, माजी सरपंच नवनाथ चव्हाण सह आदी उपस्थित होते.

## गणोरे येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**गणोरे** : अकोले तालुक्यातील श्री क्षेत्र गणोरे येथे मंगळवार (दि. ७ एप्रिल) पासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला प्रारंभ होत आहे. हा सप्ताह दि. १४ एप्रिलपर्यंत चालणार असून या काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाचा शुभारंभ ह.भ.प. मदन महाराज वर्पे, पांडुरंग महाराज फरगडे व योगी केशव बाबा चौधरी यांच्या हस्ते घटस्थापना, कलशपूजन, वीणापूजन व ध्वजपूजनाने होणार आहे. दररोज रात्री विविध कीर्तनकारांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये शांतिनिकेतन महाराज आहेर, अर्चनाताई आहेर, बाळकृष्ण महाराज डावरे, व्यंकटेश महाराज सोनवणे, विवेक महाराज केदार यांचा समावेश आहे.

## माहेश्वरी सभेची कार्यकारिणी निवड उत्साहात





**श्रीरामपूर** : तालुका माहेश्वरी सभेची कार्यकारिणीची निवड नुकतीच उत्साहात पार पडली. या निवड प्रक्रियेत राकेश न्याती यांची अध्यक्षपदी तर योगेश करवा यांची मंत्रिपदी निवड करण्यात आली. तसेच, उपाध्यक्षपदी जीवन सोमाणी, खजिनदारपदी गोपाल चांडक, सहमंत्रिपदी कैलास सोमाणी, संघटन मंत्रीपदी सूरज सोमाणी तसेच क्रीडा मंत्रीपदी सागर मुंदडा यांची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेवेळी जिल्हा प्रतिनिधी म्हणून प्रदीप अट्टल (सोनई) व सुहास सिकची (सोनई) उपस्थित होते. तसेच श्रीनिवास बिहाणी, संदीप बूब, महेश बंग, पुरुषोत्तम झंवर, विशालजी फोपळे, अतुल न्याती, चेतनजी भुतडा, डॉ. अतुल करवा, राजेश राठी, कमल मुंदडा, मुकेश न्याती आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीरामपूर पंचायत समिती इमारतीला आता महाराष्ट्र दिनाचा मुहूर्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : गेल्या काही वर्षापासून वेगवेगळ्या संकटाला तोंड देत उभ्या असलेल्या श्रीरामपूर तालुका पंचायत समितीच्या नवीन इमारतीला एक मे महाराष्ट्र दिनाचा मुहूर्त मिळण्याचे संकेत आहेत.

पंचायत समितीच्या रखडलेल्या फर्निचर कामासाठी शासनाकडून १ कोटी ९५ लाखाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. निविदा निघून फर्निचर चे काम जोमात सुरू आहे.

सन २०१९ मध्ये या नव्या इमारतीला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात या इमारती चा पाया रचण्यात आला होता. माजी महसूल राज्यमंत्री आमदार अब्दुल सत्तार यांना आमंत्रित करून विद्यमान जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी या इमारतीला मध्यंतरीच्या काळात पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न केला.




तालुका पंचायत समितीच्या या नव्या इमारतीला प्रारंभी ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. बांधकाम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली होती. मात्र बॅक टू बॅक लागलेल्या आचारसंहिता, अस्थिर सरकार या पार्श्वभूमीवर ही इमारत पूर्ण होण्यासाठी तब्बल ८ वर्षाचा कालावधी लागला आहे.

सध्याची कार्यरत वापरात असलेली इमारत १९६६ मध्ये बांधण्यात आली आहे. १९७८ व १९८४ मध्ये या इमारतीची दुरूस्ती करण्यात आली होती. मात्र, त्याकाळच्या सोयीनुसार बांधण्यात आलेली ही इमारत जुनी तर झाली आहेच, शिवाय गैरसोयीची आणि अपुरीही पडत आहे.

त्यामुळे नवी इमारत बांधणे अत्यावश्यक होते. स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यानंतर जिल्हा परिषदेने यासंबंधीचा प्रस्ताव सरकारकडे पाठविला होता.

तळ मजला पार्किंग, पहिला आणि दुसरा मजला अशी ग्रीन बिल्डिंग संकल्पनेनुसार ही इमारत बांधण्यात आली आहे. नैसर्गिक प्रकाश योजना, जलपुनर्भरण, पर्यावरणपूर्वक बांधकाम साहित्य, पाणी व वीज यांचा काटकसरीने वापर अशा नियमावलीनुसार ही इमारत आज अनेकांचे लक्ष वेधत आहे.

इमारतीत महिला पदाधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष आणि प्रसाधनगृहही बांधण्यात आले आहे. नियमानुसार दिव्यांगासाठी सुविधाही उभारण्यात आली आहे. २४ जुलै २०१९ ला बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली ही इमारत दोन वर्षांत बांधून पूर्ण करावयाची होती. मात्र वेगवेगळ्या संकटाला तोंड देत ही इमारत लवकरच अधिकाऱ्यांसह जनतेच्या वापरासाठी खुले होण्याची संकेत आहेत

## तुकाई शिंगवे येथे रंगला कुस्त्याचा आखाडा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा** – नेवासा तालुक्यातील शिंगवे तुकाई येथील ग्रामस्थांचं ग्रामदैवत तुकाई देवीमातेच्या चैत्र पौर्णिमेनिमित्त होणाऱ्या यात्रा उत्सवात चितपट कुस्त्यांनी आखाडा रंगला.

घोडेगाव पासून तीन कीलो मीटर अंतरावर असलेल्या शिंगवे तुकाई येथील तुकाई देवीमातेच गावापासून दोन किलोमीटर अंतरावर नदीकाठी एकांतात अतिशय पुरातन मंदिर असून अतिशय जागृत देवस्थान असल्याची भावना शिंगवे तुकाईसह परिसरातील भाविकांची असल्यामुळे यात्रेनिमित्त परीसरासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक दर्शनासाठी येत असल्यामुळे यात्रा कमिटी कडून विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाच यावर्षी आयोजन करण्यात आल होतं यात कावड मिरवणूक छबीना,हजेरी व जंगी कुस्त्याचा हगामा भरवण्यात आला होता. यात्रेनिमित्त मंदिर परिसर गर्दीने फुलून गेला होता विशेष करून महिलांची उपस्थिती लक्षणीय असल्याने संसार उपयोगी वस्तू तसेच मुलांना खेळणी साहीत्य खरेदी करण्यासाठी महीलांनी मोठी गर्दी केली होती. यानिमित्त भरवण्यात आलेल्या कुस्तीच्या जंगी हंगाम्यात अनेक नामांकित मल्लांनी हजेरी लावून आपली कसब दाखवली . या आखाड्यात शेवटची कुस्ती गावातील कुस्तीपटू राजेंद्र होंडे तसेच संभाजीनगर येथील मल्ल यांच्यात लढत झाली. या मल्लांना ग्रामस्थांकडून ११ हजार रुपये इनाम देण्यात आला.

हा यात्रा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यात्रा कमिटीचे प्रमुख माजी सरपंच योगेश होंडे, दीपक पवार, सतीश थोरात, भाऊसाहेब धायबर, संभाजी पवार, विठ्ठल दिघे, संतोष दिघे, दत्तात्रय दंरदले, केरुभाऊ गवळी, सुनिल विधाते, भाऊसाहेब होंडे, एकनाथ बिरदकर, एकनाथ पवार, बाळासाहेब गवळी, उध्वराव होंडे, योगेश संजय होंडे, दीपक पवार, बद्रीनाथ गुंड, उत्तम माधव पवार, एकनाथ पवार, गोविंद दिघे, अशोक दिघे, गणेश दिघे , रवींद्र पवार, यांनी परिश्रम घेतले.

## लोणी बसस्थानक स्वच्छतेने झळाळले



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : 'हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान' अंतर्गत लोणी बसस्थानक येथे सोमवारी (दि. ६) चौथे सर्वे क्षण उत्साहात पार पडले. या वेळी बसस्थानक परिसरातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा तसेच व्यवस्थापनाची सखोल पाहणी करण्यात आली.

सर्वेक्षण समितीमध्ये नाशिक विभागाचे विभाग नियंत्रक क्षिरसागर, यंत्र अभियंता शेळके, आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड, वाहतूक नियंत्रक रावसाहेब पर्वत (लोणी बसस्थानक) तसेच नंदकिशोर कानकाटे आदी अधिकारी उपस्थित होते.

लोणी बसस्थानक व ग्रामपंचायतीच्या वतीने मान्यवर अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. बसस्थानक परिसरातील स्वच्छता, नीटनेटकेपणा व शिस्तबद्ध व्यवस्था पाहून अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

या प्रसंगी लोणी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी उपसरपंच अनिल नानासाहेब विखे, किसनराव विखे, रंगनाथ बाळाजी विखे, राहुल धावणे, विजयराव लगड, भाऊसाहेब विखे, सरपंच सौ. कल्पना मैड, उपसरपंच गणेशराव विखे, खंडु धावणे, राजेंद्र मते, दिलीप जगन्नाथ विखे, एन. डी. विखे, सोपानराव विखे, बद्रीनाथ विखे, ग्रामसेविका, माजी सरपंच बनसोडे, गणेश मधुकर विखे, जालिंदर विखे, किशोर धावणे आदींचा सहभाग होता. एकूणच, या सर्वेक्षणामुळे लोणी बसस्थानकाच्या स्वच्छतेला नवे बळ मिळाले असून ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम अधिक प्रभावी ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## नेवासा हे महत्त्वाचे पुरातत्त्वीय स्थळ : डॉ. नाईक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील संत ज्ञानेश्वर मंदिरात आयोजित नेवाशाची प्राचीन संस्कृती या विषयावर डॉ.नाईक यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



नेवासा हे अश्मयुगीन, ताम्रपाषाण व सातवाहनकालीन बहुसंस्कृतींचे अवशेष आढळणारे भारतातील एकमेव महत्त्वाचे पुरातत्त्वीय स्थळ असून पुरातत्त्व अभ्यासाच्या दृष्टीने नेवासा येथील लाडमोड टेकडी अत्यंत महत्त्वाची आहे असे प्रतिपादन डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागाचे प्रा. डॉ. सतीश नाईक यांनी केले.

नेवासा येथील संत ज्ञानेश्वर मंदिरात आयोजित नेवाशाची प्राचीन संस्कृती या विषयावरील कार्यक्रमात डॉ.नाईक हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के हे होते.यावेळी जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे,रामकृष्ण विवेकानंद आश्रमाचे महंत ब्रम्हचारी ज्ञानेश्वर महाराज, गोपाल महाराज आवकाळे,अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे संचालक शंतनूदादा हापसे, देवस्थानचे जनसंपर्क आशिष कावरे उपस्थित होते.

प्राचार्य लांडगे म्हणाले की मध्ययुगीन कालखंडातील नेवाशाची प्राचीन संस्कृती' विषयावरील व्याख्यान आयोजित केले होते.ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र, शिवभारत या ग्रंथांच्या निर्मितीशी नेवासे गावाचा निकटचा संबंध आहे. या ग्रंथांमुळे मराठी संस्कृती उभी राहिली आहे. म्हणून नेवासा हे मराठी साहित्य, संस्कृतीचे प्रारंभीचे केंद्र आहे.हभप देविदास महाराज म्हस्के म्हणाले की संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये जगातील अनेक विषयांचे वर्णन केले पण ठिकाणाचे वर्णन केलेले नाही; मात्र नेवाशाच्या पावित्र्याचे वर्णन करताना त्यांनी तीन ओव्या खर्च केल्या आहेत. यावरून या क्षेत्राची महती स्पष्ट होते.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी नेवासा हे स्थान अनादिकाळापासून पवित्र असल्याचे म्हटले असून सुमारे चार हजार वर्षांपूर्वी येथे लाडमोड संस्कृती अस्तित्वात होती. नेवासकरांनी या प्राचीन संस्कृतीचा अभिमान बाळगून पुढील पिढ्यांसाठी ती जपली पाहिजे लअसे त्यांनी सांगितले. यावेळी प्रा. डॉ. सतीश नाईक यांनी भविष्यात नेवासा परिसरात पुरातत्त्वीय संशोधनाचे काम करण्याची तयारी दर्शवली, तर प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे यांनी लाडमोड टेकडीवर पुन्हा एकदा पुरातत्त्वीय उत्खनन व्हावे अशी मागणी केली.कार्यक्रमाचे नियोजन संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाने केले.

## प्रा. बाबासाहेब गवते यांना 'महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार'



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : समता प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित भव्य सोहळ्यात शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा. बाबासाहेब जालिंदर गवते यांना यंदाचा मानाचा महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते गवते यांना सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आपल्या भाषणात आमदार तांबे यांनी शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करत प्रा. गवते यांच्या कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणारे शिक्षक समाजाचे खरे शिल्पकार आहेत, असे ते म्हणाले.कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी, पालक व नागरिकांची मोठी उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देताना प्रा. गवते यांनी हा पुरस्कार विद्यार्थ्यांना समर्पित केला.

## अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजचे 'अमृत स्पंदन' उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'अमृत स्पंदन २०२६' या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मनं जिंकली. मराठमोळ्या परंपरेपासून ते देशाच्या विविध सांस्कृतिक रंगांचे दर्शन घडवणाऱ्या कलाविष्कारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली.




कार्यक्रमाचे उद्घाटन मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते झाले. यावेळी विश्वस्त ड. आर. बी. सोनवणे, विलास वर्पे, तुळशीनाथ भोर, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश आदी मान्यवर उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात पारंपरिक पद्धतीने फेटे बांधून व फुगे सोडून कार्यक्रमाची सुरुवात झाली. झांजरी व लेझीम पथकांनी विशेष आकर्षण ठरले. ट्रॅडिशनल डे, मिसमॅच, रेट्रो आणि बॉलीवूड डे अशा विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. त्यानंतर बासरी संगीतावरील नृत्य, फ्युजन साँग, लावणी, बिहू, भांगडा, आसामी नृत्य, देवीचा गोंधळ, खंडोबा गीत, आईचा जागर आदी सादरीकरणांना प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत प्रतिसाद दिला. 'तारक मेहता का उल्टा चष्मा' या नाट्यछट्याने हास्याची लकेर निर्माण केली, तर 'जाणता राजा' या नाट्यप्रयोगातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित प्रसंगांनी रोमांच उभे केले.यावेळी बोलताना डॉ. सुधीर तांबे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. अभ्यासाबरोबरच क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमधील सहभाग विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडविण्यास उपयुक्त ठरतो, असे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा सांगत, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे स्पष्ट केले.यावेळी शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. संदीप पंडित, प्रा. मयुरी गाडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशाबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे व इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान

### काढणी शेतकऱ्यांसाठी डोईजड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : परिसरात २० मार्च रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे गहू, कांदा यांसह अनेक रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला असून नुकसानग्रस्त पिकांची काढणी करणेही आता त्यांच्यासाठी डोईजड ठरत आहे.

वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी गव्हाचे पीक भूईसपाट झाले आहे, तर गारपिटीमुळे कांदा पिकालाही मोठा फटका बसला आहे. भूईसपाट झालेल्या गव्हाची सोंगणी करण्यासाठी मजूर मिळणे कठीण झाले असून सोंगणीचा खर्च किमान ७ हजार रुपये प्रति एकर आहे. त्यानंतर मळणीसाठीही पोत्यामागे सुमारे ३०० रुपये खर्च येत आहे.दरम्यान, पावसामुळे गव्हाचा रंग बदलल्याने व्यापाऱ्यांकडून कमी दर दिला जात आहे. सध्या चांगल्या गव्हाला प्रतिक्विंटल २२०० ते २३०० रुपये दर मिळत असला तरी नुकसानग्रस्त गव्हाला त्यापेक्षा कमी भाव मिळत आहे.



कांदा उत्पादकांचीही अवस्था बिकट झाली आहे. अवकाळी पावसामुळे कांद्याची साठवणूक कठीण झाली असून तो लवकर खराब होण्याचा धोका वाढला आहे. त्यातच निर्यात घटल्याने कांद्याचे दरही घसरले आहेत. परिणामी उत्पादन खर्चही वसूल होणे अवघड झाले आहे.या सर्व परिस्थितीत रब्बी पिके काढावीत की शेतातच ठेवावीत, अशा द्विधा मनस्थितीत शेतकरी सापडले आहेत.

## जगात पुन्हा महामारी येणार : भविष्यवाणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा** – जगात पुन्हा महामारी येणार असुन यावर्षी काही ऋतूंमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस होऊन ढगफुटी देखील होणार आहे तसेच अनेक देशांमध्ये महायुद्ध होणार असल्याची भविष्यवाणी भाकणूककार मुक्ताजी महाराज कोकरे यांनी सांगितली आहे.

नेवासा तालुक्यातील फत्तेपूर कोकरे वस्ती येथील श्री भिवाई धुळेश्वर देवस्थानचा चैत्र पौर्णिमा निमित्त देवस्थान व समस्त कोकरे परिवाराच्या वतीने आणि श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी तुळसानंद सरस्वती (कोकरे) यांच्या मार्गदर्शनाखाली भरविण्यात येणाऱ्या यात्रेनिमित्त देवाच्या व्हईकामध्ये मुख्य भाकणूककार मुक्ताजी कोकरे महाराज यांनीही भविष्यवाणी केली आहे यावर्षी अठरा ते बत्तीस वर्षापर्यंतच्या मुलांना पीडा राहील तसेच राजकारणामध्ये मोठा धुमाकूळ होईल अशी भविष्यवाणी केली आहेफत्तेपूर यथील धुळेश्वर मंदिरात गेल्या अनेक वर्षांपासून वंशपरंपरेनुसार भाकणूककार मुक्ताजीभाऊ कोकरे यांच्या मुखातून भविष्यवाणी सांगितली जाते तसेच या ठिकाणी बोललेली मनोकामना पूर्ण होत असल्याची भावना भाविकांमध्ये असल्याने संपूर्ण महाराष्ट्रभरातून चैत्र पौर्णिमेनिमित्त होणाऱ्या यात्रेतील भविष्यवाणी (भाकनूक) ऐकण्यासाठी व धुळेश्वराच्या दर्शनासाठी अनेक भाविक येत असतात. दरवर्षी येणाऱ्या सर्व भाविकांसाठी समस्त कोकरे परिवाराकडून महाप्रसादही देण्यात येतो.

**जाहीर निविदा**

**ग्रामपंचायत बहादरपुर ता. कोपरगाव जि .अहिल्यानगर**

ग्रामपंचायत बहादरपुर ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार ,पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा फी | काम करण्याचा कालावधी | ठेवीदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे बहादरपूर ता.कोपरगाव येथे आरसीसी बंदिस्त गटार करणे | १५ वा वित्त आयोग | ६ लाख ३० हजार | ३०० | ६ महिने | सु. बे |
| २ | मौजे बहादरपूर ता.कोपरगाव येथे गाव अंर्तगत रस्ता मुरुमिकरण करणे | १५ वा वित्त आयोग | १ लाख | ३०० | ६ महिने | सु. बे |

**अटी व शर्ती** – १) निविदा फार्म माहितीपत्रक दि.७/४/२०२६ते १४/४/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा दि. १५/४/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.


**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**बहादरपुर, ग्रामपंचायत ता. कोपरगाव.**

# स्कोडा ऑटोची पहिल्या तिमाहीत सर्वाधिक त्रैमासिक विक्रीची नोंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक**, : स्कोडा ऑटो इंडिया ने २०२६ मध्येही आपली मजबूत वाढीची दिशा कायम ठेवत पहिल्या तिमाहीत (जानेवारी–मार्च २०२६) मध्ये २०,०२८ युनिट्सची विक्री करत आतापर्यंतची सर्वाधिक तिमाही विक्री नोंदवली आहे. ही मागील वर्षी याच कालावधीत विकल्या गेलेल्या१७,१३८ गाड्यांच्या तुलनेत १७ टक्के वाढ आहे. २०२५ या मैलाचा दगड ठरलेल्या वर्षावर आधार घेत, स्कोडा ऑटो इंडिया ने

आपली वाढ कायम ठेवली आहे आणि सतत स्वतःचेच विक्रम मोडत आहे, ज्यामुळे भारतीय बाजारपेठेतील तिची गती आणखी वेगाने वाढत आहे. कंपनीच्या या कामगिरीमागे स्कोडा काइलॅक ची मजबूत आणि सातत्यपूर्ण मागणी हे प्रमुख कारण ठरले आहे, ज्याने अलीकडेच ५०,००० विक्रीचा



टप्पा ओलांडला आहे.यासोबतच नव्या स्कोडा कुशाक ची ओळख, स्कोडा स्लाविया चे स्थिर योगदान, तसेच प्रीमियम एसयूव्ही सेगमेंटमध्ये

स्कोडा कोडियाक ची सातत्यपूर्ण मागणी यांचाही महत्त्वपूर्ण वाटा आहे. या टप्प्याबद्दल भाष्य करताना, स्कोडा ऑटो इंडिया म्हणालेचे ब्रँड संचालक आशीष गुप्ता म्हणाले, की, २०२६ मध्ये आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या तिमाहीसह आमची वाढीची गती कायम ठेवणे हे मागीलवर्षभरात आम्ही उभारलेल्या गतीचे ठोस प्रमाण आहे. २०२५ मध्ये विक्रमी कामगिरी केल्यानंतर, आम्ही ही गती कायम ठेवत आहोत आणि त्याच वेळी स्वतःसाठी नवीन मानदंडही स्थापित करत आहोत, हे पाहणे उत्साहवर्धक आहे. ही वाढ अधिक

मजबूत आणि सुलभ प्रोडक्ट पोर्टफोलिओ, अधिकव्यापक बाजारपेठीय पोहोच आणि ग्राहक-केंद्रित उपक्रमांवर अधिक लक्ष केंद्रित केल्याच्या एकत्रित परिणामामुळे साध्य झाली आहे. स्कोडा ऑटो इंडिया ओनरशिप अनुभव आणि आफ्टरसेल्स सपोर्टवर अधिक लक्ष केंद्रित करून ग्राहकांचा विश्वास अधिक मजबूत करत आहे. स्कोडा सुपर केअरच्या सुरूवातीने एक नवीन मानदंड स्थापित केला आहे, ज्यामध्ये संपूर्ण रेंजमध्ये ४ वर्षांची स्टँडर्ड वॉरंटी, ४ वर्षांची रोडसाइड असिस्टन्स आणि ४ लेबर-फ्री सर्व्हिसेस दिल्या जातात, ज्यामुळे ग्राहकांना संपूर्ण मानसिक समाधान आणि अंदाजे मेंटेनन्स खर्चाची खात्री मिळते. हा ग्राहक-प्रथम दृष्टिकोन सेवा प्रक्रियांमध्ये, पारदर्शकतेत आणि उपलब्धतेत सातत्याने सुधारणा करून अधिक बळकट केला जात आहे. १८० पेक्षा अधिक शहरांमध्ये ३३० कस्टमर टचपॉइंट्सच्या वाढत्या नेटवर्कसह, स्कोडा ऑटो इंडिया आपली पोहोच वाढवत आहे आणि स्थापन तसेच उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये एक अखंड आणि विश्वासार्ह ओनरशिप अनुभव सुनिश्चित करत आहे.

# आ. प्रशांत बंब यांच्या जनता दरबारात शेकडो तक्रारींचा निपटारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : स्थानिक नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात प्रशांत बंब यांच्या अध्यक्षतेखाली शेकडो तक्रारींचा तत्काळ निपटारा करण्यात आला. या दरबारात नागरिकांचा मोठा प्रतिसाद पाहायला मिळाला.

जनता दरबारात पाणी, वीज, रस्ते, महसूल, शासकीय योजनांचा लाभ अशा विविध तक्रारी नागरिकांनी मांडल्या. आमदार बंब यांनी प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाहीचे आदेश देत अनेक प्रकरणे जागेवरच निकाली काढली.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन काहींना आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्रे एका दिवसात उपलब्ध करून देण्यात आली. तसेच रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी आमदारांनी स्वतःच्या निधीतून मदत जाहीर केली, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

यावेळी अधिकाऱ्यांना कामात दिरंगाई करू नये, नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही आमदार बंब यांनी दिला.

जनता दरबारामुळे सामान्य नागरिकांना थेट लोकप्रतिनिधींशी संवाद साधता येतो आणि त्यांच्या समस्या जलदगतीने मार्गी लागतात, अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. या जनता दरबारात विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

दरम्यान यावेळी तहसीलदार नवनाथ वगवाड, प्रशिक्षनार्थी तहसीलदार सागर वाघमारे, बिडीओ अक्षय भालेकर, नायब तहसीलदार मोरे,कृषी अधिकारी प्राजक्ता रनसिंग,तालुका आरोग्य अधिकारी रंगनाथ तुपे आदी विविध शासकीय विभागाचे अधिकारि उपस्थित होते.



## संजीवनीच्या विद्यार्थ्यांची आयआयटी वाराणसीत इंटर्नशिपसाठी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : संजीवनी युनिव्हर्सिटीच्या तृतीय वर्ष कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग शाखेत शिक्षण घेत असलेल्या समीर प्रदीप जाधव व युवराज संजय विखे यांची प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), वाराणसी येथे तीन महिन्यांच्या इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. देशभरातून मर्यादित विद्यार्थ्यांची निवड होत असताना संजीवनीच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश विशेष मानले जात आहे.

या इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांना आयआयटीतर्फे निवास व भोजनाची सुविधा देण्यात येणार आहे. एआय स्किल्स, कॉम्प्युटर व्हिजन, फुल स्टॅक डेव्हलपमेंट आदी तांत्रिक कौशल्यांच्या आधारे त्यांनी निवड प्रक्रियेत यश मिळवले. आगामी तीन महिन्यांत ते 'बायोमेडिकल सिग्नल अँड इमेज प्रोसेसिंग' या क्षेत्रात संशोधनात्मक प्रकल्पांवर काम करणार असून आयआयटीचे प्राध्यापक जॅक फ्रेडो ए.आर. यांचे मार्गदर्शन त्यांना लाभणार आहे.

या यशाबद्दल संजीवनी संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे व युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सत्कार केला. यावेळी कुलगुरू डॉ. ए. जी. ठाकुर, डीन डॉ. कविता राणी, डॉ. महेंद्र गवळी व प्रा. ज्योतीमई कलिथा उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या निवडीमुळे संजीवनी युनिव्हर्सिटीच्या गुणवत्तेचा पुन्हा प्रत्यय आला आहे.




## पान १ वरुन

### खरात प्रकरणात 'ईडी'ची एंन्ट्री

चौकशीसाठी पाचारण केल्याचे समजते. खरातचे कोणाकोणाशी संबंध होते, याची माहिती पोलिसांनी संकलित केली. त्यानंतर पोलिसांनी राहात्यातील संत नागेबाबा, राहाता पीपल्स, बुलढाणा अर्बन आणि स्वामी विवेकानंद पतंसस्थेला पत्र पाठवत खरातशी संबंधित खात्याची माहिती मागविली आहे. या संस्थेत खरातने मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाली केल्या आहेत.

दरम्यान समता पतसंस्थेच्या व्यवस्थापकावर गुन्हा दाखल झाल्या नंतर या चार पतसंस्थेच्या संचालकांवर गुन्हा दाखल होण्याची टांगती तलवार कायम आहे.

जमीनीचे तसेच रोकड रकमेचे व्यवहार करणाऱ्या अनेक राजकारणी अथवा संबंधीत लोकांना एस आय टी ने समन्स बजावत त्यांचे जबाब नोंदवून घेतले आहेत . ते जबाब विसंगत असल्यास त्यांना ही एस आय टी केव्हाही गजाआड करू शकते.

### मोरे पिता–पुत्रांनी ठोकला पवारांविरुद्ध शड्डू!

केल्यानंतर ते शरद पवारांसोबत गेले नाहीत. उलट शरद पवारांनी राष्ट्रवादीची स्थापना करतानाही त्यांनी पवारांना काँग्रेस न सोडण्याचा सल्ला दिला होता. आता ८३ वर्षे वय असलेल्या विजयराव मोरे यांचे आजदेखील शरद पवारांसोबत सलोख्याचे संबंध आहेत. २०२४ला सुप्रिया सुळे आणि त्यानंतर विधानसभा निवडणुकीत युगेंद्र पवार यांच्यासाठी मोरे पिता-पुत्रांनी प्रचार देखील केला होता. मात्र, आता त्याच विजयराव मोरे यांचे सुपुत्र आकाश मोरे हे सुनेत्रा पवारांच्या विरोधात निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे बारामतीमध्ये अत्यंत रंजक राजकीय परिस्थिती पाहायला मिळत आहे. शरद पवार यांच्या पक्षाकडून बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याची भूमिका घेण्यात आली आहे. त्यामुळे आता शेवटच्या क्षणी विजयराव मोहिते आणि आकाश मोरे यांचे मन वळवून त्यांना निवडणुकीतून माघार घेण्यासाठी शरद पवार शब्द टाकणार का, हे बघावे लागेल.

### तनपुरेंची 'माघार' की 'गद्दारी'?

दिली आहे, असे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी स्पष्ट करत तनपुरेंच्या भूमिकेबद्दल अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली. भाजपने सहानुभूती आणि वारसा हक्काच्या जोरावर अक्षय कर्डिले यांना मैदानात उतरवले आहे. कर्डिले यांच्यासाठी विखे पाटील आणि भाजपची मोठी यंत्रणा कामाला लागली असतानाच, आता महाविकास आघाडीने मोकाटेंच्या रूपाने कर्डिलेंच्याच बालेकिल्ल्यातील 'कट्टर शत्रू' उभा केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या एकच प्रश्न विचारला जात आहे – प्राजक्त तनपुरेंनी ऐन वेळी दिलेली ही गुंगारा पवारांच्या राष्ट्रवादीला पचनी पडणार का? तनपुरेंनी सत्तेच्या मदतीने कारखाना वाचवण्यासाठी पवारांची साथ सोडली की त्यांच्यावर काही दबाव होता? या पोटनिवडणुकीच्या निकालानंतरच तनपुरेंच्या या 'माघारीचा' खरा अर्थ स्पष्ट होईल. तूर्तास, राहुरीचा हा आखाडा 'कर्डिले विरुद्ध मोकाटे' असा रंगला असून, 'न लढताही' तनपुरेच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले आहेत.

## 'गोष्ट साखरेची' पुस्तक प्रकाशित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : सहकार भारतीच्या वतीने साहेबराव खामकर लिखित 'गोष्ट साखरेची' या पुस्तकाचे प्रकाशन लोणावळा येथे आयोजित प्रदेश कार्यकारिणी बैठकीत संपन्न झाले. रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे आणि राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनासकर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रास्ताविक करताना सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी पुस्तकाची माहिती देत हे पुस्तक सखोल अभ्यासातून तयार झाले असून सहकार क्षेत्रातील सर्वांसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना विद्याधर अनासकर यांनी सर्व सहकारी संस्था व्यावसायिक पद्धतीने आणि प्रामाणिकपणे चालवल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले.

रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी त्रिभुवन सहकार विद्यापीठामुळे सहकार क्षेत्राला कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल, असे सांगत विद्यापीठात चालणाऱ्या विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली.

पुस्तकाचे लेखक साहेबराव खामकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक विकासात साखर उद्योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. राज्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील प्रगतीत साखर उद्योगाचा मोठा वाटा आहे. साखरेचा इतिहास, ऊसाची उत्पत्ती, साखर कारखान्यांची उभारणी, त्यातील कालानुरूप बदल, तसेच राष्ट्रीय सहकार धोरण, इथेनॉल धोरण, एफ.आर.पी. आणि एआय तंत्रज्ञान यांसारख्या विषयांचा या पुस्तकात संक्षिप्त आढावा घेण्यात आला आहे.




या प्रसंगी सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी यांच्या हस्ते साहेबराव खामकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, संघटन प्रमुख शरद जाधव, तसेच सहकार भारतीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. आभार पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी मानले.

## शिरसगावचा असिम पठाण पोलीस दलात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : येथील खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित, न्यू इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ वाणिज्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असिम पठाण याची बीड पोलिस दलात निवड झाली असुन.त्याच्या या यशामुळे शाळा व शिरसगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. असिम पठाण याने अत्यंत कठोर परिश्रम घेऊन, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.. ग्रामीण भागातील सर्वसामान्य व गरीब कुटुंबातुन आलेल्या असिमने स्पर्धा परीक्षांची तयारी करत आपले ध्येय गाठले आहे. त्याच्या या यशाबद्दल कॉलेजचे माजी प्राध्यापक वधवाणी यांनी त्याच्या घरी जाऊन पालकांसमवेत त्याचा सन्मान आणि सत्कार केला. संस्था पदाधिकारी,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. जिद्द,मेहनत आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास कोणतेही ध्येय साध्य करता येते, परिस्थिती शिक्षणाच्या आड येत नाही हे असिम पठाण याने आपल्या यशातुन सिद्ध केले आहे.



## पोलीस शौर्य सन्मान २०२६'ने शाम गुंजाळ यांचा गौरव




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : कर्तव्यनिष्ठा, धाडस आणि समाजसेवेचा आदर्श जपणाऱ्या पोलिसांच्या सन्मानार्थ आयोजित '९२.७ बिग एफएम पोलीस शौर्य सन्मान २०२६' या सोहळ्यात शेवगाव पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार शाम गुंजाळ यांना गौरविण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा मानाचा 'पोलीस शौर्य सन्मान' प्रदान करण्यात आला.

दिमाखदार वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते गुंजाळ यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. समाजाच्या सुरक्षेसाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी वेळोवेळी दाखवलेले धाडस, तत्परता आणि समर्पण वृत्ती या पुरस्कारामागील प्रमुख कारणे ठरली.या सन्मानामुळे शेवगाव पोलीस ठाण्यासह संपूर्ण अहिल्यानगर पोलीस दलाचा मान उंचावला असून जनतेच्या सेवेसाठी कार्यरत असलेल्या पोलिसांच्या कार्याची पुन्हा एकदा दखल घेण्यात आली आहे.हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून संपूर्ण टीमचा आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाचा आहे. यामुळे समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढली असून भविष्यातही अधिक जोमाने सेवा देत राहीन, अशी भावना शाम गुंजाळ यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास उपमहापौर धनंजय जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, सागर ढिकले यांच्यासह जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व पोलिस कर्मचारी उपस्थित होते. गुंजाळ यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत वेदिका मुथ्था तालुक्यात प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : तालुक्यातील भानसहिवरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेतील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी वेदिका निलेशकुमार मुथ्था हिने नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत राज्यात नववी जिल्ह्यात दुसरी व नेवासा तालुक्यात पहिली येण्याचा मान मिळवून

लक्षवेध प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश संपादन केले तसेच मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत तिने उत्तम यश मिळवले. वेदिका मुथ्था हिला गटशिक्षणाधिकारी साहित्यिक संजय कळमकर,केंद्रप्रमुख रविंद्र कडू पाटील, मुख्याध्यापक राजेश जगताप,वर्ग शिक्षक अशोक ढोले व इतर सहकारी शिक्षकांचे व पालकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मी, **अमीर चांदभाई शेख**, रा. सात्रळ, ता.राहुरी जाहीर करतो/करते की "**अमीर चांद शेख**" व "**अमीर चांदभाई शेख**" ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून ती माझीच आहेत. यापुढे सर्व शासकीय व पासपोर्ट कामकाजासाठी माझे नाव "**अमीर चांदभाई शेख**" असे मानण्यात यावे.

## बाबासाहेब सौदागर यांच्या धौस कादंबरीचे प्रकाशन

श्रीरामपूर : चित्रपट गीतकार तथा साहित्यिक निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांच्या धौस या कादंबरीचे पुणे येथे प्रकाशन करण्यात आले. महाराष्ट्रातील लोककलेची होत चाललेली वाताहत या कादंबरीत अत्यंत कलात्मक पद्धतीने चित्रित करण्यात आली आहे. तमाशा ही लोककला लयाला जाऊन तिचे ऑर्केस्ट्रामध्ये रूपांतर झाल्याचे वास्तव या कादंबरीत प्रभावीपणे मांडले आहे. अंगप्रदर्शन आणि अश्लीलतेच्या वाढत्या प्रभावामुळे लोककलेचे व्यापारीकरण कसे झाले, याचे वास्तवदर्शी चित्रण यात आढळते. निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांनी अनेक मराठी चित्रपटांसाठी गीतलेखन केले असून चित्ररंग या कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्रभर कला सादर केली आहे. त्यांच्या कविता व चित्रपट गीतांचा विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. या समृद्ध अनुभवातून त्यांनी धौस ही कादंबरी प्रभावीपणे साकारली आहे. लवकरच या कादंबरीवर चित्रपट निर्मिती होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME MAMTA VISHAL GUPTA ( PASSPORT NO.N3138951) (BEFORE NAME ) TO NEW NAME AS MAMATA VISHAL GUPTA (AADHAR NO. 4549 9039 5927) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 06/04/2026

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME MAMTA VISHAL GUPTA ( PASSPORT NO.N3138951) (BEFORE NAME ) TO NEW NAME AS MAMATA VISHAL GUPTA (AADHAR NO. 4549 9039 5927) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 06/04/2026

CHANGE OF NAME

Old Name ISMAIL MOHAJAM PINJARI. New Name ISMAIL MOHAJAM SHAIKH, Address : Samarthnagar, Kolhar, Tal. Rahata, Dist. Ahilyanagar. 413710

# वाकडीच्या खंडोबा मंदिरास मल्हारी भक्तांकडून तलवार भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : राहाता तालुक्यातील वाकडी येथील खंडोबा मंदिरास मूळ साकुरी येथील रहिवाशी व हल्ली अहिल्यानगर येथे स्थायिक असलेले मल्हारी भक्त रमेश जयराम धापटकर यांनी त्यांच्या आई वडिलांच्या स्मरणार्थ पोलाद धातू असलेली तलवार भेट दिली. त्याकाळी खंडेराय महाराजांच्या वापरात असलेल्या तलवारीसारखीच ही हुबेहूब तलवार आहे.

राहुल धापटकर व अभिजित धापटकर यांनी ही तलवार वाकडी गावात आणल्यावर सदरील तलवारीचे वाजत गाजत भंडारा उधळण करून खंडोबा मंदिरपासून गावातून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर ही तलवार ग्रामस्थ व खंडोबा देवस्थानच्या ताब्यात देण्यात आली. खंडेराय महाराज बानुबाईला आणण्यासाठी चंदनपुरी जात असताना त्याकाळी वाकडीत मुक्काम केला होता. त्यावेळी त्यांच्या हातात असलेल्या तलवारीची हुबेहूब प्रतिकृती असलेली तलवार (खंडा) धापटकर बंधुंनी वाकडीच्या खंडोबा मंदिरास भेट दिली. सुमारे साडेबावीस किलो वजनाची ही तलवार खंडोबा मंदिरात ठेवण्यात आली आहे.



## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि .०७ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४६<br>१२८<br>१०० | १–० | १९०<br>१२७<br>५५० | जोड<br>१२-७०-८४-०९-३५ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>६६० | २–७ | १२४<br>१७९<br>११५ | जोड<br>२६-९७-४१-०३-१५ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४५<br>२८०<br>४६० | ०–६ | १२३<br>४४८<br>८८० | जोड<br>०२-४६-५३-१८-६९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

द•ख•ल



## सुचिता काकडे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**देवदैठण :** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण (मेखणी ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील उपक्रम शील शिक्षिका सुचिता सुरेश काकडे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने निगडी ( पुणे ) येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रात विशेष उल्लेखनिय कार्य करणाऱ्या शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. यामधे सुचिता काकडे यांना त्यांच्या विशेष उल्लेखनिय शैक्षणिक कार्याची दखल घेत जगात नंबर वन म्हणून गौरविल्या गेलेल्या शाळेतील शिक्षक दत्तात्रय वारे यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपमहापौर शर्मिला बाबर, पुण्याचे उपजिल्हाधिकारी शुभम पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. बाबासाहेब कारेकर तसेच ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुदाम शेंडगे आदी मान्यवर उपस्थिती होते.

## २१ एप्रिल पासून शिक्षक बेमुदत संपावर




**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेची कार्यकारिणीची बैठक नुकतीच माध्यमिक शिक्षक भवनात पार पडली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली.

महाराष्ट्र शिक्षक फेडरेशनचे उपाध्यक्ष चांगदेवराव कडू यांनी जिल्हा संघटनेने फेडरेशनने ठरवून दिलेल्या दिशा निर्देशामध्ये काम केले पाहिजे असे आवाहन कार्यकारिणीला केले. संघटनेचे मार्गदर्शक शिवाजीराव ढाळे यांनी संघटनेच्या संघर्षाचा इतिहास आणि याआधी संघटनेने केलेल्या आंदोलनाचे यश यांचा आढावा घेतला. माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे व राज्य संघटनेचे कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा व येणाऱ्या काळात संघटनेच्या दिशादर्शनाबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न त्यामध्ये सुधारीत पेन्शन योजना, टीईटीची सक्ती, संच मान्यतेच्या जाचक अटी, पट पडताळणीचे बदलेले निकष, कायम विना अनुदानित शाळांचे स्वयं अर्थसाहित शाळांमध्ये रूपांतरण, शिक्षकेतर बांधवांचे प्रश्न, सरकार जाणीवपूर्वक विविध प्रश्न निर्माण करून संघटना शिक्षकांमध्ये भेद निर्माण करत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

## श्री मैड क्षत्रिय सोनार समाज महाराष्ट्र प्रदेशची बैठक संपन्न

**अहिल्यानगर :** श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज महाराष्ट्र प्रदेश पदाधिकारी बैठक नगरमध्ये संपन्न झाली,यावेळी श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री हरिषजी खजवाणिया,सचिव भरत खजवानीया,उपाध्यक्ष अनिल कडेल,सहसचिव संदीप खजवानीया, खजिनदार राजकुमार अग्रोया ,सहखजिनदार कमलकिशोर बदलीया यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून प्रतिनिधी उपस्थित होते. आलेल्या प्रतिनिधींचे श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज अहिल्यानगर चे अध्यक्ष अध्यक्ष श्री श्रीकीसनजी मिरांडे,युवा मंच अध्यक्ष व भाजपा शहर जिला उपाध्यक्ष श्री गोपाल वर्मा,श्री मदनलालजी मिरांडे, श्री कांतिलालजी जवडा, श्री ओमप्रकाश सहदेव,श्री भरत वर्मा, श्री अशोक धुप्पड, श्री कन्हैयालाल वर्मा, श्री गोपीकीसन वर्मा, इ त्यांचे स्वागत करून सत्कार केले. समाजाच्या निवडणुका ७ वर्षानंतर पुणे येथे झाल्या,नवीन कार्यकारणी निवडण्यात आली.त्यानंतर नगर मधील ही पहिलीच बैठक होती व समाजातील जनजागृतीसाठी राज्यात दौरा सुरु करण्यात आला,त्यानंतर राज्यातील प्रत्येक ठिकाणी समाजाचे पदाधिकाऱ्यांचे निवड किंवा निवडणुका घेण्यात येणार आहेत,यावेळी राज्य पदाधिकाऱ्यांचे अहिल्यानगर समाजाच्या वतीने सर्वांचे स्वागत करून सन्मान करण्यात आले.

## अनुवाद अधिकारी म्हणून डॉ. बोरुडे यांची निवड


**अहिल्यानगर :** मराठीतील ख्यातनाम साहित्यिक डॉ. संजय बोरुडे यांची केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयात वरिष्ठ अनुवाद अधिकारी म्हणून निवड झाली आहे . डॉ. संजय बोरुडे हे प्राथमिक शिक्षक असून त्यांनी मुंबई विद्यापीठातून '१९९० नंतरची मराठी ग्रामीण कविता ' या विषयावर पीएच.डी . प्राप्त केली आहे. डॉ.बोरुडे यांनी विमलेश त्रिपाठी ( प . बंगाल ) यांचा कवितासंग्रह हिंदीतून मराठीत , सॅन्दोर हालमोसी(हंगेरी ) यांचा कविता संग्रह इंग्रजीतून मराठीत , प्रशांत कुमार महांति (ओरिसा) यांचा कथासंग्रह हिंदीतून इंग्रजीत, शशिकांत हिंगोणेकर यांचा कवितासंग्रह मराठीतून हिंदीत, रावसाहेब जाधव यांचा बालकविता संग्रह मराठीतून हिंदीत अनुवादित केला आहे.

# लोहसरच्या यात्रेतील कुस्त्यांचा 'हगामा' बंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** लोहसर (खांडगाव) ता. पाथर्डी येथील भैरवनाथ देवस्थान ट्रस्टने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गेल्या काही वर्षांपासून कुस्ती क्षेत्रात वाढलेली बेशिस्त, पैलवानांची व्यावसायिक वृत्ती आणि 'फिक्स' झालेल्या (नूरा) कुस्त्यांच्या विरोधात भूमिका घेत, देवस्थानने पुढील वर्षापासून यात्रेतील कुस्ती हंगामा कायमचा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या कुस्ती मैदानाच्या जागी आता युवक आणि शेतकऱ्यांसाठी उपयुक्त प्रकल्प राबवले जाणार आहेत.

देवस्थानचे अध्यक्ष अनिल गिते पाटील यांनी कुस्ती क्षेत्रातील सद्यस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. कुस्ती हा छत्रपती शाहू महाराजांनी जोपासलेला मर्दानी खेळ आहे. मात्र, आजच्या काळात कुस्ती ही केवळ औपचारिकता राहिली आहे. ८-१० वर्षांपूर्वी पैलवान मैदानात जोडीने फिरवले जायचे, आधीच




जोड्या ठरवून 'बोगस' कुस्त्या केल्या जातात. पैलवान एकमेकांच्या संमतीने कोणाचे तरी नुकसान करतात किंवा कुस्ती बरोबरीत सोडवतात. ज्या कुस्ती शौकीन प्रेक्षकांच्या टाळ्यांनी मैदान दुमदुमायचे, तिथे आज उस्फुर्त प्रतिसाद मिळेनासा झाला आहे. कुस्ती हंगामाच्या जागी आता अत्याधुनिक वाचनालय चझडउ आणि णझडउ चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वाचनालय उभारले जाईल. तसेच

फळबाग आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी केंद्र सुरू करण्यात येईल.

**कुस्तीऐवजी बैलगाडा अन् घोडा शर्यत :**

कुस्तीचा कार्यक्रम बंद केला असला तरी, यात्रेच्या उत्साहात भर टाकण्यासाठी देवस्थानने तिसऱ्या दिवशी नवीन खेळांचे नियोजन केले आहे. खांडगाव येथील ५३ एकर जमिनीवर बैलगाडा आणि बैल-घोडा शर्यतींचे आयोजन केले जाणार आहे. यासाठी आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत.

### धडाडीचे निर्णय; पुरोगामी निर्णयांचा वारसा

लोहसर गावाने यापूर्वीही अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले आहेत. यामध्ये देवाची 'दैवी सावकारकी' (फंड) बंद करणे, महिलांना मंदिर प्रवेश देणे, तेल-नारळ-अगरबत्ती बंद करणे यांसारख्या निर्णयांचा समावेश आहे. यंदाची यात्राहि याच शिस्तीत पार पडली असून, कावडी मिरवणूक आणि छबीना पारंपारिक वाद्यांच्या गजरात संपन्न झाला.

बोगस कुस्त्यांवर लाखो रुपये उधळायचे नाहीत. युवकांच्या भविष्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी या पैशाचा वापर व्हावा, हाच यामागचा उद्देश आहे.

**- अनिल गिते पाटील, अध्यक्ष (भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट, लोहसर)**

वडगाव शिंदोडी शाळा व्यवस्थापन समितीचे

## अध्यक्षपदी रमेश पवार तर उपाध्यक्षपदी सचिन पवार



**लिंपणगाव :** जिल्हा परिषद प्राथ. शाळा वडगांव शिंदोडी येथे दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी शाळा व्यवस्था पन समिती निवड तसेच अध्यक्ष व सदस्य निवड खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली अध्यक्ष पदी रमेश संपत पवार व उपाध्यक्ष पदी सचिन रोहिदास पवार यांची सर्वानुमते निवड झाली. तसेच म ाजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्ष पदी शरद अर्जुन पवार यांची बिनविरोध निवड झाली. मुख्याध्यापक अशोक कळमकर सर, पदवीधर शिक्ष क रायकर सर, बनकर सर, गवारे मॅडम, बनकर मॅडम, वाळुंज मॅडम यांनी त्यांचा सत्कार केला.

## श्रीगोंदा वकील संघात गोंधळाचा कळस!

### नियम धाब्यावर बसवत निवडणुका : ॲड.गायकवाड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा वकील संघाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नियमबाह्य कामकाज, बेकायदेशीर निवडणुका आणि आर्थिक पारदर्शकतेचा अभाव या मुद्द्यांमुळे संपूर्ण संघ वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

मिळालेल्या तक्रार अर्जानुसार, सन २०१८ पासून नोंदणीकृत असलेल्या वकील संघात नियम व नियमानुसार कामकाज होत नसल्याचा आरोप ॲड झुंबरराव गायकवाड यांनी जिल्हा न्यायालयाकडे करण्यात आला आहे.

नुकत्याच श्रीगोंदा वकील संघाच्या निवडणुका पार पडल्या आहेत त्यानंतर सर्व निवडी जाहीर झाल्या सर्वजण पदावर विराजमान झाले मात्र त्यानंतर ॲड झुंबरराव गायकवाड यांनी जिल्हा न्यायालयाकडे एका तक्रारी अर्ज दाखल केलं आहे त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे कि वळिक संघाच्या वार्षिक निवडणुका, सर्वसाधारण सभा आणि सदस्य नोंदणी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे समोर आले आहे. आतापर्यंत हिशोब गायब, पारदर्शकतेला हरताळ असून वकील संघाच्या आर्थिक व्यवहाराबाबत कोणतीही अधिकृत माहिती सदस्यांना देण्यात आलेली नाही. लेखापरीक्षण झाले नसल्याचा आरोप असून, त्यामुळे संस्थेच्या आर्थिक कारभारावर संशयाची छाया निर्माण झाली आहे. हि निवडणुका की 'सेटिंग'? असाही आरोप गायकवाड यांनी केला आहे सन २०२५-२६ मध्ये झालेल्या निवडणुका पूर्णतः बेकायदेशीर असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. नियमांचे उल्लंघन करून पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आल्याचा आरोप असून, यामुळे संपूर्ण कार्यकारिणीच प्रश्नचिन्हाखाली आली आहे.याबाबत प्रशासनालाही अंधारात ठेवले? असून धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे आवश्यक 'चेंज रिपोर्ट' सादर करण्यात आलेला नसल्याचेही तक्रारीत नमूद आहे. म्हणजेच, अधिकृत नोंदीतच अनेक बाबी गायब असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.याप्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे या प्रकरणी संबंधितांनी थेट उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केली आहे.हा सगळा गोंधळ संपत नाही जोपर्यंत नियमबाह्य कारभार थांबत नाही, तोपर्यंत वकील संघावर प्रशासक नेमावा, अशी जोरदार मागणी तक्रारी अर्जात करण्यात आली आहे .

## घुगलवडगावमध्ये सुवर्णा दांगडे यांचा गौरव

### पिंपरी-चिंचवड शहर पोलीस पदावर निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव येथील शेतकरी कुटुंबातील कन्या सुवर्णा रामदास दांगडे हिने जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर पिंपरी चिंचवड शहर पोलीस दलात स्थान मिळवले असून, तिच्या या यशाबद्दल गावात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर घुगलवडगाव येथे तिच्या सत्काराचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



सदर सत्कार समारंभाला गावातील विद्यमान सरपंच मिलिंद कदम, उपसरपंच रावसाहेब दांगडे, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन गोपीनाथ दांगडे, माजी व्हाईस चेअरमन सुनील पवार, माजी सरपंच कैलास दांगडे यांच्यासह सोसायटीचे संचालक रवींद्र गलांडे, रोहिदास दांगडे, मुरलीधर गलांडे, बाळासाहेब दांगडे, आबासाहेब लोखंडे, सुभाष दांगडे, रघुनाथ दांगडे, गौतम शामराव दांगडे, धर्मादाय आयुक्त जालिंदर मेजर दांगडे, ह.भ.प. कृष्णा महाराज दांगडे, आबासाहेब दांगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे कोहक महादेव (दादा) यांच्यासह गावातील म ोठ्या संख्येने महिला भगिनींनीही उपस्थित राहून सुवर्णा दांगडे यांचे कौतुक करत शुभेच्छांचा वर्षाव केला. कार्यक्रमात दत्तात्रय दांगडे, कांतीलाल दांगडे, दीपक पवार, सुधीर पवार, दत्तात्रेय गलांडे,अंकुश गलांडे आदी मान्यवरांचीही उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सुवर्णा दांगडे हिच्या यशाचे कौतुक करत तिच्या मेहनतीचा आणि संघर्षाचा विशेष उल्लेख केला. ग्रामीण भागातील मुलींनीही शिक्षण व स्पर्धा परीक्षांद्वारे मोठ्या पदांवर पोहोचावे, असा संदेश त्यांनी दिला.

सत्काराला उत्तर देताना सुवर्णा दांगडे हिने आपल्या जीवनातील खडतर प्रवास उलगडला. शेतकरी कुटुंबातील मर्यादित परिस्थितीत शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला, मात्र आई-वडिलांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचा पाठिंबा आणि विशेषतः सासरच्या सावंत कुटुंबीयांचे म ोलाचे सहकार्य लाभल्यामुळे हे यश संपादन करता आले, असे तिने नमूद केले. पुढेही प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडत समाजाची सेवा करण्याचा निर्धार तिने व्यक्त केला.

कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत उत्साहपूर्ण होते. गावकऱ्यांनी सुवर्णा दांगडे हिच्या यशाचा आनंद साजरा करत तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सारोळा सोमवंशी येथे २०० कुटूंबांना मोफत चूल वाटप

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत घर तिथे चुल उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**देवदैठण :** श्रीगोंदा तालुक्यातील सारोळा सोमवंशी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत घर तिथे चुल उपक्रमांतर्गत गावातील तब्बल २०० हून अधिक कुटूंबांना मोफत चूल वाटप करण्यात आले.

आखाती देशामधील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर गॅस टंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. व्यावसायिक गॅसचा पुरवठा बंद झाल्याने त्याचा ग्रामीण भागात घरगुत्ती वापराच्या सिलेंडर टाकी मिळण्यावर सुद्धा परिणाम झाला आहे. याच पार्श्वभूमीवर गावातील लोकांची गॅसविना परवड होऊ नये म्हणून सरपंच उज्वला राहूल आढाव यांच्या पुढाकारातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत घर तिथे चूल हा गरजेचा आणि नाविन्यपूर्ण उपक्रम नुकताच राबविण्यात आला. सारोळा सोमवंशी ग्रामपंचायत व वॉटर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथील सनफार्मा प्रा. लि. कंपनीच्या वतीने तीन टप्प्यात गावातील तब्बल २०० हून अधिक कुटूंबांना विश्वास जावळे,




अमोल चाबुकस्वार यांच्या हस्ते मोफत चुलीचे वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच संदिप ननवरे, पोलिस पाटील कैलास उदार, नारायण ननवरे, सुधीर सोमवंशी, विठ्ठल आढाव, मधुकर आढाव, देविदास आढाव, देवराम उदार संदिप आढाव, मोसीम तांबोळी, राजेंद्र उदार सिद्धार्थ सोमवंशी, विष्णू नवले आदी उपस्थित होते.

## आजपासून राज्यभर कामबंद आंदोलनाचा इशारा; ९६,४०० कोटींची देयके प्रलंबित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य आर्थिक अडचणीत सापडल्यामुळे विकासकामे करणाऱ्या कंत्राटदार व विकासकांची देयके मोठ्या प्रमाणावर थकलेली आहेत. निधीअभावी ही देयके अदा होत नसल्याने राज्यभरातील सर्व विकासकामे दि. ७ एप्रिल २०२६ पासून कामबंद आंदोलनाद्वारे बंद ठेवण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नोव्हेंबर २०२५ मध्ये मोठ्या गाजावाजात सत्तेत आलेल्या सरकारला आज १७ महिने पूर्ण झाले असले तरी प्रत्यक्षात आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली आहे. अर्थसंकल्पात मोठमोठी आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात राज्याची तिजोरी रिकामी असल्याचे चित्र आहे.

राज्यातील विविध विभागांमध्ये प्रलंबित देयकांची आकडेवारी चिंताजनक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात मागील वर्षी ३७,००० कोटींपैकी अद्याप २९,००० कोटी बाकी आहेत. जलजीवन मिशन व महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरणात ३९,००० कोटींपैकी ३५,००० कोटी प्रलंबित आहेत. ग्रामविकास व जलसंधारण विभागात ८,५०० कोटींपैकी ६,५०० कोटी, पर्यटन विकास महामंडळात ४,३०० कोटींपैकी ३,८०० कोटी, नगरविकास विभागात २,७०० कोटींपैकी २,१०० कोटी, जलसंपदा विभागात ११,००० कोटींपैकी ९,००० कोटी तर जिल्हा नियोजन समिती व इतर विभागांमध्ये १४,००० कोटींपैकी ११,००० कोटी देयके अद्याप बाकी आहेत.

याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्था व महानगरपालिकांकडेही निधीअभावी नवीन कामे सुरू झालेली नाहीत आणि तेथील प्रलंबित देयकांचाही आकडा मोठ्या प्रमाणावर आहे. या पार्श्वभूमीवर मा. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच संबंधित मंत्र्यांना २६ फेब्रुवारी २०२६ व ३ मार्च २०२६ रोजी लेखी निवेदन देण्यात आले होते. तसेच ९ मार्च २०२६ रोजी कर्जत येथे झालेल्या राज्यस्तरीय कंत्राटदार बैठकीत कामबंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. मागील वर्षी एकूण १,१६,५०० कोटी रुपयांची देयके प्रलंबित होती. सध्या ही रक्कम ९६,४०० कोटींवर आली असली तरी गेल्या १७ महिन्यांत शासनाने केवळ सुमारे २०,००० कोटी रुपयांचीच देयके अदा केली आहेत.

## जैन सोशल फेडरेशनने आरोग्य सेवेचा दीपस्तंभ निर्माण केला : कांकरिया

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी हॉस्पिटल यांचे आशीर्वाद आणि प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने आरोग्यं सेवेचा दीपस्तंभ निर्माण करण्याचे काम जैन सोशल फेडरेशन अविरतपणे करत आहे. समाजात विशेषतः ग्रामीण भागात डोळ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. परिणाम दृष्टीदोष वाढतो. यासाठी आनंदऋषीजी नेत्रालयाच्या माध्यमातून वेळोवेळी शिबिरे घेऊन जास्तीत जास्त रूग्णांचा दृष्टीदोष बरा करण्याचं काम येथील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम करत आहे. अत्याधुनिक नेत्रोपचार सुविधा रूग्णांना मिळण्यासाठी स्व. कुंदन कांकरिया यांनी नेत्रालयाच्या स्थापनेपासून योगदान दिले. त्यांचे हे कार्य पुढे कायम ठेवण्यासाठी कांकरिया परिवार भविष्यातही निश्चित योगदान देईल अशी ग्वाही मदन कांकरिया यांनी दिली.



जैन सोशल फेडरेशनचे सक्रिय सदस्य स्व. कुंदन कांकरिया यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत नुकतेच मोफत नेत्र तपासणी व उपचार मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी श्री भवरीलाल कांकरिया बोलत होते. यावेळी श्री मदनभाऊ कांकरिया, अभय कांकरिया व कांकरिया परिवारातील सदस्य तसेच जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, बाबूशेठ लोढा, डॉ. आशिष भंडारी, नेत्र तज्ज्ञ डॉ. अशोक महाडिक, डॉ. प्रतिक कटारिया, आनंद छाजेड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, आनंदऋषीजी नेत्रालय येथे जागतिक दर्जाच्या नेत्रोपचार सुविधा उपलब्ध आहेत. नगरसह मराठवाड्यातील रूग्णांना याचा लाभ होत असतो. सावेडी उपनगरातील नागरिकांच्या सोयीसाठी तारकपूर येथे शाखा सुरू करण्यात आली. याठिकाणी गेल्या ५ महिन्यात ५००० पेक्षा जास्त रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला व २०० पेक्षा अधिक नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या. स्व. कुंदन कांकरिया यांनी जैन सोशल फेडरेशनच्या कार्यात योगदान देताना नेत्रालयाच्या विस्तारात मोठे योगदान दिले. त्यांच्या सेवाभावी स्वभावामुळे असंख्य रूग्णांना निर्दोष दृष्टी मिळण्यास हातभार लागला आहे. त्यांच्या स्मृती कायम जपण्याचा प्रयत्न राहील. शिबिरात ९० रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन आनंद छाजेड यांनी केले. डॉ. प्रतिक कटारिया यांनी आभार मानले.

**शेवगाव नगरपरिषद**
**शेवगाव,ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर**

जा.क्र./नपशे/४०/२०२६, **कार्यालय फोन :(०२४२९) २२१२४१,** दि.०६/०४/२०२६

### जाहीर सूचना

शेवगांव शहरातील सर्व नागरीकांना या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते कि, शेवगांव शहरातील महिला व बाल कल्याणासाठीच्या कौशल्य विकास अंतर्गत १८ ते ४३ वयोगटातील एकल,विधवा, दारिद्रय रेषेखालील,मुलींना व महिलांना व बचत गटातील महिलांना व्यावसायिक/ रिटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण योजने अंतर्गत MS-CIT या व्यावसायिक प्रमाणपत्राकरित्ता प्रशिक्षण देणेकरिता महिलांचे नाव नोंदणी अभियानाला मुदतवाढ देण्यात येत असून दि.०७ /०४/२०२६ ते २०/०४/२०२६ पर्यंत देऊन नगरपरिषद कार्यालयामार्फत नाव नोंदणी आयोजित करण्यात आलेले आहे. तरी शेवगाव नगरपरिषद हद्दीतील पात्र महिला लाभार्थ्यांनी सदर कालावधीमध्ये कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून उत्पन्नाचा दाखला सत्यप्रत,जातीचा दाखला सत्यप्रत,आधार कार्ड सत्यप्रत,रेशन कार्ड सत्यप्रत,तहसील स्थानिक रहिवासी पुरावा व इत्तर कागदपत्रे महिला व बाल कल्याण विभाग नगरपरिषद शेवगाव क्रीडा संकुल, शेवगाव-पैठण रोड, शेवगाव नगरपरिषद नवीन कार्यालय येथे सादर करावेत.


**टीप :- प्रथम येणाऱ्यास प्राधान्य राहील.**

**मुख्याधिकारी**
शेवगाव नगरपरिषद, शेवगाव, जि.अहिल्यानगर

## द • ख • ल

### श्री बाबा नीम करोलीजी महाराज यांच्या जीवनावर चित्रपट

**वाघोली पुणे :** संपूर्ण भारतातील भक्तांच्या हृदयात स्थान मिळवलेले श्री बाबा नीम करोली जी महाराज यांचे जीवन आता चित्रपटाच्या माध्यमातून आपल्यासमोर येत आहे. हा चित्रपट २४ एप्रिलपासून भारतभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत असून, भक्तांना बाबाजींच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचा अनुभव घेता येणार आहे. शरद सिंह ठाकूर यांच्या दिग्दर्शनाखाली, सुबोध भावे आणि मिलिंद गुणाजी यांसारख्या गुणी कलाकारांनी




बाबाजींच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांना साकारले आहे. विशेष अभिमानाची बाब म्हणजे वाघोलीतील मॅजेस्टिक मॅनहॅटन येथील रहिवाशी शंतनू वर्मा यांनी बाबाजींच्या बालपणाची भूमिका साकारली आहे.या भूमिकेसाठी शुटींगपूर्वी शंतनूने बाबाजींच्या परम भक्तीला समर्पण दाखवत मांसाहाराचा त्याग केला. एवढ्या लहान वयात एवढा भक्तीभाव सिद्ध करून त्याने बाबाजींप्रती आपली श्रद्धा प्रकट केली आणि या भूमिकेसाठी त्याची निवड सार्थ ठरवली. हा चित्रपट आपल्या संपूर्ण कुटुंबासोबत पाहा आणि बाबाजींच्या कृपेचा अनुभव घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे.

### आदिवासी क्षेत्र व समुदायाचा विस्तृत विकासावर भर द्या-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे :** जिल्हाधिकारी यांनी मत्स्यव्यवसाय वृद्धिंगत करण्याकरिता धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान या सहयोजनेतर्गत पुणे जिल्ह्यातील सन २०२५-२६ करिता प्राप्त परिपूर्ण प्रस्तावांस पुढील कार्यवाहीस्तव मंजुरी प्रदान केली आहे.  या बैठकीस सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय पुणे, व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव कार्यालयाचे प्रतिनिधी, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी आदी उपस्थित होते. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय घटक वृद्धिंगत करण्याकरिता धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान  ही सह-योजना राबविण्यास शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-११२५/प्र. क्र.७१/पदुम १४ दिनांक ४/९/२०२५ अन्वये मान्यता प्राप्त आहे.त्यानुषंगाने  पुणे जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ९९ गावांतील आदिवासी क्षेत्रातील इच्छुक लाभार्थींकडून प्रस्ताव मागणीस्तव जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुषंगाने सदर प्राप्त प्रस्तावांची छाननी करून परिपूर्ण असलेले प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी तथा प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना जिल्हास्तरीय मंजुरी व सनियंत्रण समिती पुढे मंजुरीस्तव मांडण्यात आले होते.  प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही सहयोजना राबविण्यात येत असून या योजनेमध्ये जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ९९ गावांचा धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान या सहयोजनेत समावेश आहे. आदिवासी क्षेत्र व समुदायाचा विस्तृत विकास करण्यासाठी मूळ पायाभूत सुविधा तसेच आर्थिक सबलीकरण होऊन सामाजिक प्रवाहात आणणे तसेच मत्स्य व्यवसाय वृद्धिंगत करणे हा योजनेचा मुख्य उद्देश असून जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबवा, अशी सूचना जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केली आहे.

### नास्तिक मेळाव्यातील वक्तव्यांवरून संत परंपरेचा अवमान

**आळंदी :** नास्तिक असणे हा गुन्हा नसला, तरी स्वतःची नास्तिकता सिद्ध करण्यासाठी वारकरी संप्रदायाचे सर्वोच्च दैवत श्री विठ्ठल यांना 'कालबाह्य' म्हणणे अयोग्य असल्याचे सांगत आळंदी देवस्थानकडून डॉ. मुग्धा कर्णिक यांच्या वक्तव्यांचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. पुणे येथे २२ मार्च रोजी पार पडलेल्या 'महाराष्ट्र नास्तिक मेळावा २०२६'मध्ये डॉ. कर्णिक यांनी धर्म, पंथ व संस्कृती संदर्भात केलेली विधाने आक्षेपार्ह असल्याचे संस्थानकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, समतेचा पाया रचणारे संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांचा विडंबनात्मक उल्लेख करून महाराष्ट्राचे लोकदैवत श्री विठ्ठल तसेच 'वारी' परंपरेला कालबाह्य म्हणणे निषेधार्ह आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही वारकरी परंपरेचीच देणगी असून, संबंधितांनी ही बाब लक्षात घ्यावी, असेही संस्थानने स्पष्ट केले. वारकरी संप्रदायाने गेली सुमारे ७५० वर्षे समाजात समतेचा संदेश देत सर्व स्तरांतील लोकांना एकत्र ठेवण्याचे कार्य केले आहे. या रे या रे लहान थोर, याति भलते नारीनर या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा उल्लेख करत समाज एकसंघ ठेवण्यात संत परंपरेचे योगदान अधोरेखित करण्यात आले आहे. अभ्यासाअभावी काही व्यक्ती सवंग लोकप्रियतेसाठी बेताल वक्तव्ये करीत असल्याची खंत व्यक्त करत, डॉ. मुग्धा कर्णिक यांनी आपल्या विधानाबद्दल संत परंपरा व श्री विठ्ठल यांची क्षमा मागावी, अशी अपेक्षा आळंदी देवस्थान कमिटीने व्यक्त केली आहे. आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त अॅड.राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज कबीरबुवा, अॅड.रोहीणी पवार, पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या सह्यांनी हे निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# निसर्गाचा कोप,वाढती महागाई कवडी मोल बाजारभाव

## आंबेगाव तालुक्यातील बळीराजा मेटाकुटीस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे :** अवकाळी पाऊस गारपीट वादळी वारा त्यातच जागतिक महायुद्धाचा परिणाम आर्थिक महामंदी या सर्व अस्मानी संकटात सापडलेला बळीराजा आजच्या घडीला निसर्गाच्या अस्मानी संकटांना तरी एकीकडे जागतिक महामंदीला सामोरे जाताना पहावयास मिळतो

आंबेगाव तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पहिली असता आंबेगाव तालुका हा खेड्यापाड्यांचा तालुका म्हणून ओळखला जातो . तसेच औद्योगिकीकरणामध्ये शैक्षणिक कारखानदारी उद्योग व्यवसाय यामध्ये अग्रेसर असणारा पुणे जिल्हातील एकमेव तालुका म्हणून ओळखला जातो याचबरोबर तालुक्याची राजकीय परिस्थिती पाहाली असता तालुक्यामध्ये जनतेचे लोकप्रतिनिधी तुल्यबळ असणारे नेते आहेत. यामुळे या तालुक्याचा बऱ्यापैकी कायापालट झाला असून तालुका जरी विकासाकडे अग्रक्रमण करत असला तरी तालुक्यातील बळीराजा आजही बऱ्यापैकी कर्जपणामुळे तसेच निसर्गाच्या वाढत्या बदलामुळे मेटाकुटीस आला आहे.

> " कांदा पिक भाजीपाला धना मेथी तोंडाशी आलेले पिक भुईसपाट झाले. अवकाळी पावसाने संपुर्ण शेतातील पिक पाण्याने सोडून जाणे कांदा पिकाच बुरशी लागणे यामुळे साठवणीचा कांदा यामध्ये निम्म्याने घट होते . शासन फक्त पंचनामे करते . मात्र खर्चाच्या मानाने हजार बाराशे रुपये खात्यावर जमा करते. समाधानासाठी फक्त सांतवण केल्याचे भासवते . असेच चालले तर काही दिवसाने शेती आणि शेतकरी वर्गाला आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नाही "'.
>
> **राजेंद्र फलके, आमोंडी शेतकरी**

आंबेगाव तालुक्याचा पश्चिम पट्टा हा प्रामुख्याने आदीवासी पट्टा म्हणून ओळखला जातो . यामध्ये प्रामुख्याने सह्याद्रीच्या कुशीत वसणाऱ्या आदिवासी बांधवांचा समावेश होत असला तरी येथील शेती तसेच शेतीपूरक व्यवसाय हे मोठ्या प्रमाणात असल्याने येथील शेतकऱ्यांना जरी रोजगार मिळाला असला तरी सद्याच्या सरकारच्या धोरणातील असणाऱ्या बळीराजावर शेती व व्यवसायासाठी लागणाऱ्या कर्जावरती नाराज असून झालेल्या कर्जमाफीत शेती कर्जाला शासनाने केलेली माफी कितपत योग्य आहे की फक्त बळीराजाच्या तोंडाला पाने पुसली अशी परिस्थिती आज आंबेगाव तालुक्यातील शेतकरी वर्गास पाहावयास मिळते . शेतकीय मालाला बाजार भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याला आपला माल कवडीमोल बाजारभावात विकावा लागतो .सध्या बळीराजाच्या डोळ्यामध्ये आश्रू आणणारा कांदा पिकास जरी मोठ्या प्रमाणात मागणी असली तरी. जागतिक महायुद्ध तसेच बाजार भाव आणि अस्मानी निसर्गाचा कोप यामुळे आजही आमच्या बळीराजाच्या डोळ्यात हाच कांदा अश्रू आणत आहे . अवकाळी पाऊस ' गारपीठ ' कामगारांचा तुटवडा यामुळे पुरता बेजार झालेला बळीराजा या हि वर्षी भिकेचे डोहाळे लागल्याचे दिसते . शासनाने सध्या महायुद्धाचा परिणाम कांदा आयात होत असल्याने शेतकऱ्याच्या कांद्याला कवडीमोल बाजारभाव मिळत असून बळीराजा हा मेटाकुटीस आला आहे . एकीकडे निसर्गाचा खेळ तर दुसरीकडे शासनाचे शेतकऱ्यांचे असणारे धोरण या दोन्हीच्या मिलापाने आजचा शेतकरी वर्ग खरोखरच सुखी आहे का ? मागील काही महिन्यांपूर्वी सरकारने जे काही कर्जमाफीची धोरण राबविले यावर किती अर्थाने शेतकऱ्याला सातबारा कोरा झाला ? अजूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार का? शेतकऱ्यांच्या बाजारभावाला हमीभाव मिळेल का ? अशे विविध प्रश्न हे आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना पडला आहे. आंबेगाव तालुक्यातील बहुतांशी शेती हि बागायती शेती म्हणून ओळखली जाते यामध्ये कांदा पिक हे प्रामुख्याने घेतले गेले असले तरी तालुक्याच्या विकासात असणाऱ्या कांदा उत्पादक शेतकरी नाराज झाले असून ,नक्की शेती मध्ये करावा काय हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे.





> ' दरवर्षी कृषी विभाग व महसुल विभागामार्फत पंचनामे करुन बळीराज्याच्या पदरी तुटपुंजी मदत केली जाते . शेतीत झालेल्या खर्चाच्या तुलनेत चारानेही रक्कम मिळत नाही. ना बाजारभाव की नाही कर्जमाफी . कर्जाचा डोंगर माथ्यावर घेऊन सावकाराच्या बडग्यात आडकलेला बळीराजा कधी मोकळा श्वास घेईल असा गंभीर प्रश्न बळीराजा पुढे निर्माण झाला आहे."
>
> **निलेश काळे, प्रगतशील शेतकरी**

> " यावर्षी मिरचीचे पीक घेतले ' बाजारभावही चांगला आहे मात्रअवकाळी पाऊस त्यात वादळी वारा गारपीट यामुळे मिरची पिकाचे पिकांची होणारी नासाडी . यामुळे करावे तरी काय ? शासन पंचनामे करते तर घातलेले भांडवलही वसूल होत नाही. मात्र बळीराजा कर्जाचा डोंगर डोक्यावर घेऊन निसर्गाच्या अस्मानी संकटांना सामोरे जातो. सरकारने योग्य उपाययोजना करावी".
>
> **राम फलके, आमोंडी शेतकरी**

## भोंदूगिरीविरोधात एमएएनएसची मोहीम

# अंधश्रद्धेला आळा घालण्यासाठी राज्यभर जागर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** समाजातील अंधश्रद्धा, भोंदूगिरी,बुवाबाजी व अमानवी प्रथा यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (चअछड) च्या माध्यमातून राज्यभर व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे आणि अंधश्रद्धेपासून समाजाची मुक्तता करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे प्रतिपादन राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकारणी सदस्या तथा महाराष्ट्र राज्य बुवाबाजी संघर्ष विभागाच्या कार्यवाह नंदिनी जाधव यांनी केले आहे.



समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी सुरू केलेल्या या चळवळीने गेल्या काही वर्षांत गावोगावी जाऊन लोकांमध्ये जागृती निर्माण केली आहे. तसेच विविध शिबिरे, प्रबोधनपर कार्यक्रम, व्याख्याने आणि प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून बुवाबाजी,भोंदू बाबांच्या तथाकथित चमत्कारांचा पर्दाफाश करण्यात येत आहे.

अंधश्रद्धा व जादूटोणा यांसारख्या कुप्रथांवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा २०१३ लागू करण्यात आला आहे. या कायद्यांतर्गत मानवी बळी, जादूटोणा, भूतबाधा काढण्याच्या नावाखाली होणारे अत्याचार, तसेच चमत्काराच्या नावाखाली होणारी फसवणूक यांना कठोर शिक्षा करण्यात येते.राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष तात्काळ निर्माण करण्याचे मत ही जाधव यांनी व्यक्त करतानाच शासनाचा तसा आदेश असताना तो केवळ कागदावरच अडकला कि काय ? अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. अनेकदा नागरिकांची भोंदूबाबाकडून गुप्तधन काढून देतो असे सांगून त्यांचे आर्थिक,मानसिक व शारीरीक शोषण केले जाते भोंदू बाबाकडून अशी फसवणूक झाल्यास अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संपर्क साधण्याचे आवाहन जाधव यांनी केले आहे.


दरम्यान, अंधश्रद्धा निर्मूलन समिती व राज्य बुवाबाजी संघर्ष विभाग समितीच्या पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही चमत्कारांवर किंवा अफवांवर आंधळा विश्वास ठेवू नये. संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ पोलिसांत किंवा संबंधित संस्थांकडे तक्रार करावी. तसेच मुलांमध्ये लहानपणापासून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. असेच काही अघोरी प्रकार घडताना कोणाला निदर्शनास आल्यास तात्काळ राज्य बुवाबाजी संघर्ष विभागाच्या कार्यवाह नंदिनी जाधव यांच्या ९४२२३०५९२९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जाधव यांनी केले आहे.

अंधश्रद्धा ही समाजाच्या प्रगतीस अडथळा ठरत असून, तिचे निर्मूलन करण्यासाठी शासन, संस्था आणि नागरिक यांचा संयुक्त सहभाग आवश्यक असल्याचे मत नंदिनी जाधव यांनी व्यक्त केले आहे.

# अहिल्यानगरमध्ये 'दुसरे बालपण' स्पर्धा ज्येष्ठांसाठी कला-आनंदाचा अनोखा उत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** ज्येष्ठ नागरिकांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. कांकरीयांचे मानकन्हैया ट्रस्ट यांच्या वतीने 'दुसरे बालपण स्पर्धा २०२६' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील पहिलीच अशी ही स्पर्धा असून यंदा तिचे तिसरे वर्ष साजरे होत आहे.या स्पर्धेचा मुख्य उद्देश ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या 'दुसऱ्या बालपणात' आनंद, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास देणे हा आहे. 'खास ज्येष्ठ नागरिकांसाठी कला-आनंद उत्सव' या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.




विविध कला प्रकारांचा समावेश असून स्पर्धेमध्ये नाटिका, संगीत नाटिका आणि नृत्यनाटिका असे विविध सादरीकरण प्रकार ठेवण्यात आले आहेत. यावर्षीचा विषय 'विवाह सोहळा एक उत्सव' असा ठेवण्यात आला असून, सहभागी स्पर्धकांनी या विषयावर आधारित सादरीकरण करायचे आहे.

स्पर्धेची तारिख व स्थळ - ही स्पर्धा बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी माजली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे. स्पर्धेसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ४ मे २०२६ ठेवण्यात आली आहे.या स्पर्धे साठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली असून स्पर्धे तील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. सांघिक प्रथम पारितोषिक : ५००० सांघिक द्वितीय पारितोषिक : ३०००-,सांघिक तृतीय पारितोषिक : २०००,उत्तेजनार्थ पारितोषिक : १०००

तसेच सर्व विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विशेषतः उत्कृष्ट लेखनासाठी स्वतंत्र पारितोषिकाचीही तरतूद करण्यात आली आहे.यासाठी संपर्क व नोंदणी करण्यासाठी इच्छुकांनी अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी ९८५०८८७८३८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या कलागुणांना वाव देत त्यांच्या आयुष्यात नवचैतन्य निर्माण करणारा हा 'दुसरे बालपण' उपक्रम समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरत आहे.

# निरा नदीत केमिकलयुक्त पाणी सोडत नसल्याचा दावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर (ता. बारामती) –** बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर सह साखर कारखान्याकडून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी अथवा केमिकलयुक्त पाणी निरा नदीमध्ये सोडले जात नसल्याचे कारखान्याच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे. चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी याबाबत ठाम भूमिका मांडत, कारखान्याविरोधात काही व्यक्तींनी कोणताही ठोस पुरावा नसताना दिशाभूल करणारी माहिती पसरविल्याचा आरोप केला आहे.



जगताप यांनी सांगितले की, अशा प्रकारचे आरोप पूर्णपणे निराधार असून त्यामागे वैयक्तिक स्वार्थ किंवा गैरसमज आहेत. कारखान्यात अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक ईटीपी (एषषश्रींशपीं ढॲशरींशपीं झश्ररपीं) कार्यरत असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन केले जाते.

या ईटीपी प्रकल्पामध्ये सांडपाण्याची प्रायमरी, सेकंडरी आणि टर्शियरी अशा तीन टप्प्यांत शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया केली जाते. त्यामुळे प्रक्रिया केलेले पाणी पूर्णतः सुरक्षित बनते आणि त्याचा पुनर्वापर केला जातो. हे पाणी प्रामुख्याने सिंचनासाठी तसेच कारखाना परिसरातील हरित क्षेत्रासाठी वापरले जाते. झिरो डिस्चार्ज संकल्पनेनुसार कारखाना कार्यरत असल्याचेही व्यवस्थापनाने स्पष्ट केले.

दरम्यान, पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने कारखान्याने वाघळवाडी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने ३५ एकर क्षेत्रात 'नक्षत्र वनउद्यान' विकसित केले आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ५५०० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली असून, त्यातील २.५ एकर क्षेत्रात मियावाकी पद्धतीने घनदाट वृक्षारोपण करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे परिसरातील जैवविविधता वाढण्यास मदत होत आहे.उद्यानासाठी सुमारे ३ किलोमीटर लांबीची स्वतंत्र पाइपलाईन उभारण्यात आली असून, ईटीपीमधून प्रक्रिया केलेले .

# सासवडमध्ये भाजपचा स्थापना दिन उत्साहात

## माजी आमदार संजय जगताप यांचे कार्यकर्त्यांना संघटन बळकटीचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** भारतीय जनता पक्षाचा ४६ वा स्थापना दिन सासवड येथील पक्ष कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी माजी आमदार संजय चंद्रकांत जगताप यांनी कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आणि संघटन अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाची सुरुवात भाजप ध्वजारोहणाने करण्यात आली. यावेळी संजय जगताप यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून भारतीय जनता पक्षापर्यंतच्या वैचारिक प्रवासाचा उल्लेख केला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची प्रगती होत असल्याचे सांगत कार्यकर्त्यांनी विकासकामांचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे त्यांनी नमूद केले.



सासवड येथे भारतीय जनता पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिनानिमित्त पक्ष कार्यालयासमोर ध्वजारोहण करून माजी आमदार संजय चंद्रकांत जगताप यांच्या उपस्थितीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्थापना दिन साजरा केला.

**रिपोर्टर: अनिकेत काळे**

महाराष्ट्रातही भाजपच्या माध्यमातून विकासाची गती वाढत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामकाजाचा त्यांनी उल्लेख केला. पक्षाचे कार्यकर्ते हेच पक्षाची खरी ताकद असून समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संभाजी काळाणे, संजय निगडे आणि संदीप कटके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला विठ्ठल मोकाशी, हरिभाऊ लोळे, अजय इंगळे, सायली शिंदे, सुनिता कोलते, मनिषा गायकवाड, सुनील देशपांडे, अजित जगताप, डॉ. मनोज शिंदे, प्रदीप राऊत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. स्थापना दिनानिमित्त कार्यकर्त्यांनी पक्षविस्ताराचा निर्धार व्यक्त केला. फोटोओळ:सासवड येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिनानिमित्त माजी आमदार संजय चंद्रकांत जगताप यांच्या उपस्थितीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत अभिवादन केले.

## आंबेगाव तालुक्यातील गावडेवाडी येथे भीषण आग

# शेतमजुराचा संसार क्षणार्धात राख, लाखोंचे नुकसान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या गावडेवाडीतील वनदेव वस्तीवर सोमवारी (दि. ६) दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागून शेतमजूर राहुल सिताराम खंडागळे यांचा संपूर्ण संसार काही क्षणांत जळून खाक झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अचानक लागलेल्या आगीत खंडागळे कुटुंबाचे लाकडी कुडाचे घर पूर्णतः भस्मसात झाले. घरातील संसारोपयोगी साहित्य, ज्वारी, बाजरी, तांदूळ इत्यादी धान्यसाठा, मुलांची शालेय पुस्तके, भुईमुगाच्या शेंगांची पोती, तसेच शेतीसाठी वापरला जाणारा फवारणी पंप, घरातील साहित्य असे सर्व आगीत जळून नष्ट झाले. या दुर्घटनेत सात गाभण शेळ्या आणि त्यांची लहान करडेही दगावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच काही दिवसांपूर्वी बँकेतून काढून आणलेली सुमारे ६० हजार रुपयांची रोख रक्कमही आगीत जळून खाक झाली आहे. महसूल विभागाने या आगीमध्ये अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याची नोंद केली आहे. गावडेवाडी गावात आज यात्रा असल्याने बहुतेक ग्रामस्थ बाहेर गेले होते. त्यामुळे आग लागल्याचे उशिरा लक्षात आले. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, आग लागल्याचे समजताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत जीव तोडून आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत संपूर्ण घर जळून खाक झाले होते. राहुल सिताराम खंडागळे हे मूळ जवळके बुद्रुक तालुका खेड येथील रहिवाशी असून शेतमजुरी कामी गावडेवाडी या ठिकाणी वास्तव्यास आहे. या घटनेनंतर खंडागळे कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले असून त्यांच्या आयुष्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावकऱ्यांकडून तातडीने मदत देण्याची मागणी होत असून शासनानेही त्वरित आर्थिक मदत व पुनर्वसनाची उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बारामती पोटनिवडणुकीत मतदारांसाठी 'ईसीआयनेट'ची सोय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना उमेदवारांविषयी सविस्तर व पारदर्शक माहिती सहज उपलब्ध करून देण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने 'ईसीआयनेट' या एकात्मिक डिजिटल व्यासपीठाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून मतदारांना उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता व दायित्वे, शैक्षणिक पात्रता तसेच अधिकृत सामाजिक माध्यमांवरील खात्यांची माहिती 'आपला उमेदवार जाणून घ्या' या घटकाद्वारे पाहता येणार आहे. मतदारांना ईसीआयनेटमधील निवडणूक प्रक्रिया या विभागांतर्गत हा घटक सहज उपलब्ध असून, त्याद्वारे उमेदवारांनी सादर केलेले संपूर्ण प्रतिज्ञापत्र (फॉर्म २६) देखील उतरवता येणार आहे. यामुळे मतदारांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होणार आहे. ईसीआयनेट हे जगातील सर्वात मोठे निवडणूक सेवा व्यासपीठ असून, भारतातील निवडणूक प्रक्रियेशी संबंधित ४० हून अधिक ॲप्स व संकेतस्थळे एकत्रित करून एकसंध डिजिटल अनुभव देण्यात आला आहे. या व्यासपीठाद्वारे मतदार नोंदणी, मतदार यादी शोध, अर्जाची स्थिती पाहणे, निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद, ई-मतदार ओळखपत्र डाउनलोड, मतदानाचे प्रवाह तसेच तक्रार निवारण यांसारख्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध आहेत. याशिवाय, ईसीआयनेटवर 'सी-सिव्हिजल' या ॲपद्वारे आचारसंहिता भंगाच्या तक्रारी नोंदविता येतात, तर 'सक्षम' उपक्रमाद्वारे दिव्यांग मतदारांसाठी सुलभ सेवा पुरविण्यात येत आहेत. या सर्व सुविधा एकाच सुरक्षित व्यासपीठावर उपलब्ध असल्याने मतदारांना तत्काळ माहिती व तक्रार निवारणाची प्रभावी सोय मिळत आहे. बारामती पोटनिवडणुकीत पारदर्शक, सुजाण आणि सक्रिय मतदानासाठी मतदारांनी ईसीआयनेटचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

# नरेंद्र कब मिलेगा सिलेंडर?

## राज्यभर गॅस टंचाईविरोधात वंचित बहुजन आघाडीचा आक्रोश, जनजीवन ठप्प

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** राज्यभरात वाढत चाललेल्या गॅस टंचाईमुळे सर्वसामान्यांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, दैनंदिन गरजा भागवणेही कठीण झाले आहे. या गंभीर परिस्थितीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नरेंद्र कब मिलेगा सिलेंडर? या घोषणेसह आंदोलन छेडण्यात आले असून प्रशासन आणि शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या आंदोलनाच्या माध्यमातून गॅसच्या कम तरतेमुळे सामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक, विद्यार्थी आणि कामगार वर्ग यांच्यावर होत असलेल्या परिणामांकडे लक्ष वेधण्यात आले. स्वयंपाकघरातील गॅस शेगड्या थंड पडल्याने अनेक कुटुंबांना कोळसा व लाकडाच्या चुलीचा आधार घ्यावा लागत आहे. चहाच्या टपऱ्या, रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते,





तसेच छोटे हॉटेल्स यांना आपला व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ आली आहे. परिणामी हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर संकट कोसळले आहे. गॅस टंचाईचा फटका केवळ घरगुती वापरापुरता मर्यादित न राहता, लग्न समारंभ, धार्मिक कार्यक्रम, केटरिंग व्यवसाय आणि शैक्षणिक क्षेत्रालाही बसला आहे. अनेक ठिकाणी मेस बंद झाल्याने विद्यार्थ्यांना गावाकडे परतावे लागत आहे. एलपीजीवर चालणाऱ्या रिक्षा चालकांनाही याचा फटका बसत असून भाडेवाढ झाली आहे, ज्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होत आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते बाळासाहेब आंबेडकर यांनी ११ मार्च रोजीच या संकटाचा इशारा दिला होता. एलपीजी व पेट्रोकेमिकल्सच्या टंचाईमुळे छोट्या उद्योगांवर मोठा परिणाम होईल, असे त्यांनी स्पष्ट केले होते. आज तीच परिस्थिती प्रत्यक्षात दिसत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

केंद्र व राज्य सरकार परिस्थिती साम ान्य असल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात नागरिकांना गॅससाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे, असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

काही ठिकाणी गॅस सिलेंडरचा काळाबाजार सुरू असून ५ ते ७ हजार रुपयांपर्यंत दर आकारले जात असल्याचेही निदर्शनास आले.

इतकेच नव्हे, तर काही ठिकाणी सिलेंडरमध्ये पाणी भरून देण्यासारखे प्रकार समोर आल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या आंदोलनात श्रीकांत बोर्डे, बाळासाहेब आरोळे, आकाश शिंदे, लहू शिंदे, आजिनाथ साळवे, विजय साळवे, अमोल जाधव, बाळासाहेब पंडागळे, दादू वाघमारे, तानाजी वाघमारे, कैलास वाघमारे, सचिन वाघमारे, गहिनीनाथ नाकाडे, दत्तात्रय सातपुते, अनिल बोर्डे, सुभाष पठारे, राजेंद्र बळीत, भीमराज शिंदे, प्रमोद तिजोरी, महेश राऊत, मीनाताई शिंदे, कमल शिंदे, सिंधुबाई ठोंबे, मार्कस शिंदे, अनिल शिंदे, आनंद उबाळे आदींसह अनेक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदर आंदोलनामुळे गॅस टंचाईचा प्रश्न अधिक तीव्रतेने समोर आला असून, शासनाने तातडीने ठोस पावले उचलून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी करण्यात येत आहे.

# शाळेत झाडलोट, साफसफाई करणाऱ्या आईची मुलगी झाली पहिल्याच प्रयत्नात पोलीस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** मनात जिद्द आणि ध्येय ठेवत त्यासाठी घेतलेली कठोर मेहनत व आई-वडिलांच्या कष्टांची जाण ठेवत रविशंकर विद्यामंदिराच्या वैष्णवी गणपत गदादे या विद्यार्थिनीने आपल्या आजतागायतच्या आयुष्यात पहिल्याच प्रयत्नात पोलीस बनत यश संपादन केले. शाळेत शिपाई म्हणून काम करणारी आईसह पोलीस म ुलीचा रविशंकर विद्यामंदिरात सन्मान करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका सविता बळे, पर्यवेक्षक सारिका बनकर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कायम इतर मुलांचा सन्मान शाळेच्या कोपऱ्यात पाहणाऱ्या त्या माऊलीच्या आज व्यासपीठावर सत्कार स्विकारताना डोळ्याच्या कडा अक्षरशः पाणावल्या.



रविशंकर विद्यामंदिराच्या स्थापनेत जनाबाई गदादे ही अपंग महिला शाळेत तात्पुरती स्वरूपावर शिपाई म्हणून रुजू होत झाडलोट, साफसफाई करीत असे. आपण ज्या शाळेत काम करतो तिथंच आपली मुलगी आपल्या डोळ्या देखत शिक्षण घेईल या आशयाने संस्थेचे प्रमुख कार्यवाहक नंदकुमार लांगोरे यांनी वैष्णवीस रविशंकर विद्यामंदिरात प्रवेश दिला. वैष्णवीने देखील याची जाणीव मनात ठेवत आर्थिक परिस्थितीचा कसलाही विचार न करता अभ्यास करीत आपले म ाध्यमिक शिक्षण चांगल्या गुणांनी पूर्ण केले. पुढे पोलीस भरतीसाठी वैष्णवीने पुणे येथे प्रवेश मिळवला. आपल्या जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर पहिल्याच प्रयत्नात पुणे पोलीस विभागात पोलीस बनत आई-वडिलांसह स्वताचे स्वप्न पूर्ण करीत पालकांच्या कष्टाचे चीज केले. सोमवार, दि ६ रोजी वैष्णवी आणि तत्कालीन कार्यकाळात शाळेत झाडलोट साफसफाईचे काम करणारी तिची आई जनाबाई या दोघींचा रविशंकर शाळा प्रशासनाकडून सन्मान करण्यात आला. शाळेत काम करीत असताना इतर मुलांचा आणि त्यांच्या पालकांचा सन्मान सोहळा शाळेच्या कोपऱ्यातून पाहणारी आई जेव्हा संस्थेचे प्रमुख आणि शिक्षकांच्या हस्ते लेकीच्या कर्तृत्वामुळे पुष्पगुच्छ स्वीकारताना भावुक झाली होती. तिच्या डोळ्यातील आनंद अश्रू पाहून अनेकांचे मन देखील भरून आले. यावेळी सन्मानास उत्तर देताना वैष्णवीने शाळेतील आठवणींना उजाळा दिला. मनात जिद्द आणि ध्येय ठरवत त्यासाठी कठोर मेहनत घेतले की यश हमखास मिळते. परिस्थिती कशी ही असो आपल्या क्षमतेवर विश्वास हवा. आणि त्याच विश्वासावर जग जिंकता येते असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

## मढी- पैठण यात्रा उत्सवातून शेवगाव आगाराला साडेसात लाखाचे उत्पन्न : कोतकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** नुकत्याच पार पडलेल्या पैठण येथील श्री क्षेत्र शांती ब्रम्ह एकनाथ महाराज नाथ षष्ठी व भटक्यांची पंढरी समजल्या जाणाऱ्या पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र मढी येथील कानिफनाथ यात्रेतून शेवगाव आगाराला ७ लाख ४८ हजार २९८ रुपयाचे उत्पन्न मिळाले. असल्याबाबतची माहिती शेवगाव आगार प्रमुख अमोल कोतकर यांनी दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, श्री क्षेत्र मढी व श्री क्षेत्र पैठण या दोन्ही ठिकाणच्या यात्रा प्रत्येक वर्षी एकाच पंधरवड्यात येत असून शेवगाव आगाराच्या दक्षिण व उत्तर अशा दोन बाजूला असणारे हे ठिकाण असून शेकडो वर्षापासून परंपरेने सुरू असलेला हा यात्रा उत्सव सालाबादप्रमाणे या ही वर्षी नुकत्याच संपन्न झाल्या आहेत.या यात्रेसाठी शेवगाव आगारातून १० बसेस स्पेशल यात्रेसाठी सोडण्यात आल्या होत्या तर जिल्ह्यातून वेग - वेगळ्या आगारातून मिळून यात्रेतील मुख्य उत्सव लक्षात घेता ३ दिवस सलग १०० बसेसची मागणी करण्यात आली होती. त्या मुळे शेवगाव आगारामार्फत बसच्या एकूण ५७९ फेऱ्या झाल्या असून ३८ हजार ३११ प्रवाशांची ने - आन करण्यात आली असून २४ हजार ७६१ की मी एवढे अंतर सदर बसेसने कापले असल्यानेम ुळेच आगाराला जवळपास १६ लाख ५५ हजार ६४९ रुपयाचे सवलत उत्पन्न प्राप्त झालेले आहे .त्यामध्ये आगाराला निव्वळ साडेसात लाखाचे उत्पन्न मिळाले आहे असेही शेवटी आगार प्रमुख कोतकर यांनी सांगितले आहे.

दखल

### व्यंकनाथ विद्यालयाच्या मनीषा चव्हाण यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या श्री व्यंकनाथ विद्यालयाच्या उपशिक्षिका मनिषा चव्हाण यांना संगमनेर येथील समता प्रतिष्ठानच्या वतीने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी शिक्षक पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते म हाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. समता प्रतिष्ठान हे गेले तीन वर्ष प्राध्यापक श्री विजय साळवे हे वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराचे वितरण केले जाते. यामध्ये श्री व्यंकनाथ विद्यालय लोणी व्यंकनाथ येथे कार्यरत असणाऱ्या श्रीमती चव्हाण मनीषा रोहिदास यांची एका मूल्यवर्धन प्रशिक्षण अंतर्गत या समता प्रतिष्ठान तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड केली. त्या पुरस्काराचे वितरण संगमनेर येथे दिनांक पाच एप्रिल रोजी रोजी शानदार सोहळ्यात करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमांमध्ये समता प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.निशिगंधा साळवे प्रा. श्री विजय साळवे यांच्या आदर्श मातोश्री द्वारकाबाई साळवे तसेच इतर मान्यवर व आमदार सत्यजित तांबे हेही उपस्थित होते. या पुरस्कार प्राप्त शिक्षिका श्रीमती मनीषा चव्हाण यांचा श्री व्यंकनाथ विद्यालय लोणी व्यंकनाथ येथे श्री बाळासाहेब जठार सर व इतर सर्व सहकारी शिक्षक यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिकाव अनुराधाताई नागवडे, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, शिक्षण संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ, स्कूल कमिटीचे अध्यक्ष डी आर आबा काकडे यांच्यासह स्कूल कमिटीच्या विश्वस्त मंडळाने उपशिक्षिका मनीषा चव्हाण यांचे अभिनंदन केले आहे.

### शहरटाकळी येथे महालक्ष्मी मातेचा शनीवारी यात्रोत्सव

**शहरटाकळी :** शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथील महालक्ष्मी मातेच्या दोन दिवशीय यात्रोत्सवास शनीवार दि.११ एप्रील रोजी प्रमभं होत आहे. शहरटाकळी येथील सर्व जाती धर्माचे श्रद्धास्थान असलेल्या महालक्ष्मी मातेचा दोन दिवशीय यात्रोत्सव पुर्व परंपरा प्रमाणे चैत्र नवमीला शानीवार दि.११ एप्रील व रविवार दि.१२ एप्रील रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होत असून, महालक्ष्मी मातेला यात्रोत्सवाच्या दिवशी नाथसागर येथून कावडीने आणलेल्या गंगाजलाने अभिषेक घातला जातो, नवसपूर्तीसाठी शेरनी (गूळ)वाटपाचा कार्यक्रम, सायंकाळी पूर्वीपासून चालत आलेल्या प्रसिद्ध अशा बारागाडी ओढण्याचा कार्यक्रम , संध्याकाळी पालखी मिरवणूक, दुसऱ्या दिवशी रविवार दि.१२ रोजी हजेऱ्या व कुस्त्यांचा जंगी हागाम्याचे आयोजन करण्यात आले असून ,यात्रा उत्सवानिमि त्त विविध धार्मिक , सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्थ ग्रामस्थ व यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

### काल्याच्या कीर्तनाने होणार नारळी सप्ताहाची आज सांगता

**खरवंडी कासार :** श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे भगवानगडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या बडेवाडी ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह सुरू असून सप्ताहाचा आज काला आहे. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९२ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी अष्टपैलू संत, वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवत बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे तृतीय उत्तराधिकारी तथा विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

# पोलिसांच्या गाड्यांवर अजून ‘अहमदनगर’! आदेशाला केराची टोपली?

दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** महाराष्ट्र शासन यांच्या अधिकृत निर्णयानुसार अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर असे करण्यात आले असून या निर्णयाला केंद्र सरकार यांचीही मान्यता मिळाली आहे. शासनाच्या विविध अधिकृत वेबसाईट्स, रेल्वे तसेच एसटी महामंडळाच्या नोंदींमध्ये अहिल्यानगर नावाचा वापर सुरू झाला आहे.मात्र तरीही श्रीगोंद्यात पोलीस प्रशासनाच्या गाडीवर ठळकपणे अहमदनगर लिहिलेले असल्याम ुळे पोलिसांकडून सरकारच्या आदेशाला केराची टोपली दाखवली जात असल्याचा आरोप नागरीकातून होताना दिसत आहे

राज्य सरकारने मागील काही वर्षांपूर्वी अनेक जिल्ह्याचे नामकरण केले त्यामध्ये औरंगाबाद चे संभाजीनगर तसेच अहमदनगरचे अहिल्यानगर असेही नामकरण करण्यात आले त्यासाठी अधिकृत शासन निर्णय काढण्यात आला त्यानुसार सगळीकडे नावात बदल करण्यात राज्याबरोबर केंद्रानेही नामकरण स्वीकारले त्यानुसार सर्वच ठिकाणी अहमदनगर चे अहिल्यानगर करण्यात आले मात्र, दुसरीकडे श्रीगोंदा तालुक्यातील पोलिसांच्या सरकारी वाहनांवर अजूनही अहमदनगर पोलीस असेच नाव झळकत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी प्रत्यक्षात कितपत झाली आहे, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम ाचे वातावरण निर्माण झाले आहे.नामांतराच्या निर्णयानंतर सर्व शासकीय विभागांनी एकसंधपणे नव्या नावाचा अवलंब करणे अपेक्षित असताना, पोलिस विभागातील ही विसंगती लक्षवेधी ठरत आहे.

**जिल्ह्यात कागदावर ‘अहिल्यानगर’**

एकीकडे सर्वत्र ‘अहिल्यानगर’, तर दुसरीकडे पोलिसांच्या गाड्यांवर अजूनही ‘अहमदनगर’ हा नेमका कोणता कारभार?




असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.दरम्यान, शासनाच्या निर्णयाची पूर्ण आणि तात्काळ अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त होत आहे. अन्यथा, कागदोपत्री अहिल्यानगर आणि प्रत्यक्षात अहमदनगर अशी दुहेरी स्थिती कायम राहून प्रशासनाच्या कार्यक्षम तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.कि जाणून बुजून राज्य सरकारच्या आदेशाला केराची टोपली दाखवली जात आहे कि काय ? त्यामुळे याबाबत अहिल्यानगर पोलीस अधीक्षक यांनी स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे. पोलिसांची नामांतराची प्रक्रिया प्रलंबित आहे का, की प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे, याचा खुलासा करावा, कारण नाव बदललं, पण ओळख अजून अडकली! असा सूर सध्या नागरिकांमध्ये उमटताना दिसत आहे.




# प्रलंबित वीज प्रश्नावर टाकळी ढोकेश्वरमध्ये आंदोलन

## महावितरणच्या अधिकाऱ्यांना ‘बांगड्यांचा आहेर’ देत कार्यालयाला ठोकले टाळे!

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित वीज प्रश्नावरून गेल्या अनेक दिवसांपासून धुमसणाऱ्या असंतोषाचा आज अखेर उद्रेक झाला. गेल्या तीन वर्षांपासून मंजूर असूनही ’आरडीएसएस’ (ठऊडड) योजनेतील सिंगल फेज वीज कनेक्शन देण्यास टाळाटाळ करणाऱ्या महावितरण प्रशासनाचा निषेध नोंदवण्यासाठी आज टाकळी ढोकेश्वर येथील उपअभियंता कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी जबाबदार अधिकाऱ्यांना ’बांगड्यांचा आहेर’ देऊन कार्यालयाला कुलूप ठोकले. या ’टाळेबंद’ आंदोलनामुळे महावितरण प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली.

लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या माध्यम ातून पारनेर तालुक्यासाठी आरडीएसएस योजनेतंर्गत महत्त्वाची वीज कामे मंजूर करण्यात आली होती. म ात्र, महावितरणच्या अधिकाऱ्यांची उदासीनता आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक गावांतील शेतकऱ्यांना अद्यापही अधिकृत वीज कनेक्शन मिळालेले नाही. हक्काच्या विजेसाठी शेतकरी गेल्या तीन वर्षांपासून कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही केवळ पोकळ आश्वासने मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध आज तुटला.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने हे आंदोलन पुकारण्यात आले होते. राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव ,म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे, आणि राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १०:३० वाजल्यापासून शेकडो शेतकरी कार्यालयाबाहेर जमले होते. रणरणत्या उन्हात सलग साडेतीन तास आंदोलकांनी ठिय्या मांडला. प्रशासनाचा निषेध करण्यासाठी शेतकऱ्यांनी सोबत आणलेल्या बांगड्यांचा आहेर अधिकाऱ्यांना सुपुर्द केला, ज्यामुळे वातावरण अधिकच तापले होते. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, तात्काळ काम सुरू करा अन्यथा कार्यालय उघडू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा सरपंच प्रकाश गाजरे यांनी घेतला. या आंदोलनात तालुक्याचे लक्ष वेधून घेणारी आंदोलकांची गर्दी जमली होती. यामध्ये सरपंच प्रकाश गाजरे, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव, राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांच्यासह सरपंच अभिजीत झावरे, पांडुरंग आहेर,भागचंद वाळुंज यांसह म्हसोबा झाप, वारणवाडी, कामटवाडी, वासुंदे, नांदूर पठार, सावरगाव, पळसपुर, काटाळवेढा, काकणेवाडी, खडकवाडी, पळशी या परिसरातील शेतकरी म ोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

# आ.काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून कुंड रस्त्याची डागडुजी सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे मळगंगा देवी यात्रा समिती, मुंबई येथील व्यवसायीक शंकरशेठ राम चंद्र वराळ पाटील, निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी पाठपुरावा केल्याने कुंड रस्त्याची डागडुजी सुरू झाली असून येत्या गुरुवार पर्यंत हे काम पुर्ण होणार असल्याची माहिती मळगंगा देवी यात्रा समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, विठ्ठलराव कवाद, रुपेश ढवण यांनी दिली आहे. राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा यात्रा उत्सव दि.१ एप्रिल पासून सुरू झाला आहे. मुख्य यात्रा शुक्रवार दि. १० एप्रिल पासून सुरू होत आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरातील कुंड यात्रा रविवार दि.१२ रोजी असून निघोज ते कुंड हा चार किलोमीटर अंतराचा रस्ता अत्यंत खराब झाला असल्याने रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी संबधीतांनी करण्यात आली होती. याबाबत ग्रामस्थ शिष्टमंडळ आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे गेले होते. आ. दाते सर यांनी लगेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना याबाबत सुचना दिल्याने हे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. कुंडावरील यात्रेसाठी पुणे,अहिल्यानगर तसेच मुंबई येथून लाखोंच्या संख्येने भावीक येत असतात. निघोज परिसरातील कुंड व शिरुर तालुक्यातील टाकळीहाजी या दोन ठिकाणी मळगंगा देवीचे मंदीरे असून दोन्ही ठिकाणचे दर्शन भावीकांना मिळत असल्याने भावीकांची संख्या मोठी असते. अहिल्यानगर जिल्हा, जुन्नर तालुका तसेच कल्याण,ठाणे, मुंबई येथील भावीक निघोज मार्गे कुंडावर जात असतात मात्र रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने हा चार किलोमीटर रस्ता अत्यंत खराब झाला असल्याने यात्रेकरू, देवीचे भावीक तसेच ग्राम स्थ यांना रस्त्याचा त्रास होऊ नये यासाठी ही डागडुजी सुरू केली असून या रस्त्याच्या डागडुजीचा समारंभ मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद सर, उपाध्यक्ष तथा मळगंगा कंट्रक्शन कंपनीचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, मळगंगा देवी यात्रा समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, यात्रा समीतीचे विश्वस्त दिलीप ढवण, भास्करराव कवाद, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ड.बाळासाहेब लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे संघटक मंगेश वराळ, विश्वस्त ड. ज्ञानेश्वर लामखडे, रमेशशेठ ढवळे, बबनराव ससाणे, रोहिदास लामखडे, विठ्ठलराव कवाद, रमेशशेठ वरखडे भास्कर ढवण आदींच्या हस्ते संपन्न झाला यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

मंगळवार, दि.७ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


## ऐतिहासिक सातारा जिल्हा पर्यटन हब बनवणार !



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर** : निसर्गसौंदर्याने नटलेल्या सातारा जिल्ह्यातील कोयना-पाटण परिसराचा कृषी व पर्यटनाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य सरकार ठोस पावले उचलणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. पाटण तालुक्यातील दौलतनगर (मरळी) येथे विविध विकासकामांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई उपस्थित होते. कोयना परिसरातील नैसर्गिक संपत्ती व ऐतिहासिक वारसा जतन करत शाश्वत पर्यटन विकास साधला जाईल, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. नव्याने उभारण्यात आलेल्या पुलाला 'सी-लिंक'सारखा आकर्षक लूक देण्याचाही मानस त्यांनी व्यक्त केला. यामुळे देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. दरम्यान, दौलतनगर येथे सुमारे ३० कोटी रुपयांच्या वास्तूचे तसेच पुलाचे उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त आयोजित तीन दिवसीय डोंगरी उत्सवात कृषी, खाद्य व जल पर्यटन प्रदर्शनांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# उंबरी-बाळापूरमध्ये बिबट्याचा थरार

## तिघे जखमी, परिसरात भीतीचे सावट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील उंबरी-बाळापूर शिवारात रविवारी (दि. ५) सायंकाळी बिबट्याने केलेल्या हल्ल्यामुळे मोठी खळबळ उडाली असून या घटनेत तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. सलग दोन ठिकाणी झालेल्या या हल्ल्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आश्वी बुद्रुक येथील संदीप खेमनर हे आपल्या दोन पुतण्यांसह प्रवरा डाव्या कालव्याजवळील शेतातून गव्हाचा भुसा ट्रॅक्टरमध्ये भरून परतत होते.

त्यावेळी अभिषेक केशव खेमनर (वय ३४) व सार्थक सुनील खेमनर (वय १७) हे दुचाकीवरून लेंडी नाल्याजवळून जात असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक झडप घातली. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे दोघांनी मोठ्याने आरडाओरडा केला. त्यांचा आवाज ऐकून बापूसाहेब निर्मळ, संदीप भुसाळ, विलास निर्मळ, सोमनाथ शिंदे, सचिन शिंदे, पप्पू होडगर व पप्पू निर्मळ हे ग्रामस्थ मदतीसाठी धावून आले. नागरिकांची गर्दी होताच बिबट्याने जवळील शेतात उडी मारून पळ काढला. या घटनेनंतर काही वेळातच उंबरी येथील डॉ. मारुती उंबरकर (वय ५२) हे घरी जात असताना त्यांच्यावरही बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात ते देखील जखमी झाले.



तिन्ही जखमींच्या पाय व मांडीवर गंभीर जखमा झाल्या आहेत. जखमींना तातडीने स्थानिकांच्या मदतीने निमगाव जाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथे डॉ. तय्यब तांबोळी यांनी प्राथमिक उपचार केले. पुढील उपचारासाठी त्यांना नगर येथे हलविण्यात आले. या वेळी आरोग्य सेविका वैशाली ठुबे, आरोग्य सेवक तेजस भांड व नरेंद्र पोटे यांनी मदत केली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वनपाल आर. के. पवार, वनसंरक्षक राहुल सातपुते, बाळासाहेब डेंगळे व अरुण साळवे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींची विचारपूस केली व पंचनामा केला.

तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाकडूनही जखमींच्या उपचारासाठी तत्काळ मदत करण्यात आली. दरम्यान, या भागात यापूर्वीही बिबट्याच्या हालचाली व हल्ल्यांच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# मळगंगा यात्रेत गैरसोय टाळण्यासाठी हालचाल

## वीज व पाण्याबाबत लंके यांचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** : पारनेर तालुक्यातील निघोज येथील प्रसिद्ध माता मळगंगा देवी यात्रेच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी प्रशासनाच्या दोन महत्त्वाच्या विभागांना स्वतंत्र पत्रे पाठवत नियोजनात पुढाकार घेतला आहे. १० ते १३ एप्रिल दरम्यान होणाऱ्या या यात्रेसाठी यंदा सुमारे ४ ते ५ लाख भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता वीज व पाणी या मूलभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. यात्रेदरम्यान प्रकाश व्यवस्था, दुकाने, धार्मिक कार्यक्रम, आरोग्य सेवा तसेच वाहतूक व्यवस्थेसाठी अखंड वीजपुरवठा अत्यंत आवश्यक असतो. या पार्श्वभूमीवर खासदार लंके यांनी विद्युत वितरण महामंडळाच्या उपकार्यकारी अभियंत्यांना पत्र पाठवून वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

लोडशेडिंग टाळणे, तांत्रिक बिघाड तात्काळ दूर करणे, अतिरिक्त मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज ठेवणे तसेच पर्यायी उपाययोजना तयार ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. दरम्यान, यात्रेच्या काळात पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी खासदार लंके यांनी कुकडी पाटबंधारे विभाग, नारायणगाव येथील कार्यकारी अभियंत्यांनाही पत्र पाठवले आहे. कुकडी कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी त्यांनी केली असून, एस्केप क्रमांक ४४ मधून निघोज गाव तसेच कुकडी नदीतील के.टी. वेअरमध्ये पाणी सोडल्यास ओढा व नदीतील पाण्याची पातळी वाढून यात्रेतील विविध गरजा पूर्ण होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले आहे. यात्रेदरम्यान भाविक मोठ्या संख्येने स्नान, पूजन व इतर धार्मिक विधी करत असल्याने ओढा व नदीत पाणी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. त्याचबरोबर स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि आरोग्यदृष्ट्या सुरक्षित वातावरण राखण्यासाठीही पाण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

संभाव्य आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी स्वच्छतेच्या उपाययोजनांवर भर देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वीज व पाणी या दोन्ही सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन खासदारांनी केले आहे. यात्रेच्या कालावधीत सतत देखरेख ठेवून कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तात्काळ उपाययोजना कराव्यात, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, लाखो भाविक यात्रेत सहभागी होणार असल्याने त्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. वीज व पाण्याच्या अडचणीमुळे निर्माण होणारे संभाव्य धोके टाळण्यासाठी यंत्रणांनी सज्ज राहावे, असे सांगण्यात आले आहे. खासदार लंके यांच्या या पाठपुराव्यामुळे प्रशासनानेही तयारीला वेग दिला असून, आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. वीज व पाण्याची योग्य व्यवस्था झाल्यास यंदाची मळगंगा यात्रा सुरक्षित, स्वच्छ आणि सुरळीत पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीचे लैंगिक शोषण; श्रीरामपूरात गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : लग्नाचे आमिष दाखवून तरुणीचे वारंवार लैंगिक शोषण केल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना २०२२ ते १२ मार्च २०२६ या कालावधीत शिरसगाव येथे घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी पीडितेने फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी अक्षय विश्वनाथ गवळी (रा. संजयनगर, श्रीरामपूर) याने लग्नाचे वचन देत फिर्यादीशी वारंवार शारीरिक संबंध ठेवून लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे.

फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने तिला घटस्फोट घेण्यास भाग पाडून शिरसगाव येथे भाड्याच्या खोलीत २ जानेवारी २०२६ ते १२ मार्च २०२६ या कालावधीत पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहत वारंवार शारीरिक संबंध ठेवले.

त्यानंतर आरोपीने लग्नास नकार दिल्याने तरुणीने पोलिसांत तक्रार दाखल केली. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ६४(२)(I) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दादाभाई मगरे करीत असून प्रभारी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

दरम्यान, आरोपी अद्याप फरार असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.

# दुसरे लग्न करण्यासाठी आईनेच केला


## ११ महिन्यांच्या मुलाचा खून

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ** : शिरूर तालुक्यातील भांबर्डे गावात एक अत्यंत हृदयद्रावक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. आईनेच आपल्या ११ महिन्यांच्या चिमुकल्याचा निर्घृण खून केल्याचा प्रकार उघडकीस आला असून संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल माहितीनुसार, फिर्यादी रवींद्र अशोक पवार (वय ३६, रा. भांबर्डे) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रवींद्र पवार यांच्या तक्रारीवरून पत्नी पूजा रवींद्र पवार हिला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ८ मार्च रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास भांबर्डे गावातील पवार यांच्या घरासमोर ही घटना घडली होती. आरोपी महिलेने आपल्या ११ महिन्याचा मुलगा यश याचे डोके सिमेंटच्या ओट्यावर आपटून त्याचा खून केल्याची कबुली दिली आहे. आम्ही कोकण मुरुड येथून फिरून आल्यानंतर मुलगा नेहमी किरकिर करून रडायचा, कोठेतरी निघून जाऊन दुसरा चांगला नवरा पाहून लग्न करावे पन मुलाला सोबत घेऊन गेल्यावर कोणी लग्न करणार नाही असा विचार करून तिने मुलगा यश याचे डोके घरासमोरील कपडे धुण्याचे सिमेंट ओट्यावर आपटवून त्याचा खून केला आहे. त्यानंतर खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिने रक्ताचे डाग पाण्याने धुऊन टाकले. व इतक्यावरच न थांबता, मृतदेह कपड्यांच्या बॅगमध्ये भरून त्यात दगड टाकून शेतातील विहिरीत फेकून दिल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. ५ एप्रिल रोजी अकस्मात मृत्यूची नोंद झाल्यानंतर पोलिसांनी सखोल तपास करत हा धक्कादायक प्रकार उघडकीस आणला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलमाच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलेला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, तसेच इतर पोलिस अधिकारी व फॉरेन्सिक पथकाने भेट देऊन तपासाला गती दिली आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर डांगे यांनीही घटनास्थळी तपासात सहकार्य केले आहे.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत ३० उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी** : राहुरी विधानसभा मतदार संघातून ३० उमेदवारांनी काल शेवटच्या दिवशी आपले नामनिर्देशन पत्र दाखल करून पोटनिवडणुक लढविण्याचे संकेत दिले आहेत. या उमेदवारांमध्ये मोकाटे गोविंद खंडु, (नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार) अक्षय शिवाजीराव कर्डिले, (महायुती भाजपा) रावसाहेब सदाराम खेवरे(अपक्ष) साहेबराव पाटीलबा म्हसे(अपक्ष)संतोष एकनाथ चोळके(वंचित बहुजन आघाडी) अनिल भिकाजी जाधव(अपक्ष) शेटे सविता रामचंद्र(अपक्ष)रवींद्र बापूसाहेब मोरे(अपक्ष) सूर्यभान दत्तात्रय लांबे(अपक्ष) हे या लढतीमध्ये उतरले असून यांच्यासह अनेक अपक्ष उमेदवार आपले नशीब अजमिवण्यासाठी निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहे आहे. यामध्ये अथर्व साहेबराव म्हसे(अपक्ष) अल्ताफ इब्राहिम शेख(अपक्ष) बिलाल गफूरभाई शेख(अपक्ष) उमेश महादेव म्हेत्रे (अपक्ष) संभाजी लक्ष्मण धोंडे(अपक्ष) जाधव नागेश विलास(अपक्ष) देशमुख इमरान नबी(अपक्ष) जाधव बाळासाहेब सोमा(अपक्ष) दत्तात्रय नारायण म्हैस(अपक्ष) कांबळे त्रिषला मिलिंद(अपक्ष) शिवाजी आनंदा कदम(अपक्ष) बर्डे सकाहरी शांताराम(अपक्ष) प्रवीण सुभाष दळवी(अपक्ष) पवार नामदेव बंडू(अपक्ष) शितोळे सुदर्शन लक्ष्मण(अपक्ष) कोळसे बाळू बापूराव(अपक्ष) खेमनर नंदकुमार भागवत(अपक्ष) आहे हापसे महेश केशव(अपक्ष) व सोहम बापूसाहेब शिंदे(अपक्ष) प्रतिभा किशोर देसरडा(अपक्ष) शोएब सुभेदार शेख(अपक्ष) इत्यादी उमेदवार आपले नशीब आजमविण्यासाठी राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

# पक्षाची यशस्वी वाटचाल जनतेच्या पाठबळावर : जितेंद्र छाजेड



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : ६ एप्रिल भाजपा स्थापना दिवस निमित्त भारत माता, पंडित दीनदयाळ उपाध्ये, अटलजी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन व पेढे वाटप करून श्रीरामपूर भारतीय जनता पार्टीच्यावतीने स्थापना दिन साजरा करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, गटनेते वैशाली चव्हाण, भाजप नेते संजय फंड,महिला शहराध्यक्ष स्वातीताई चव्हाण, नगरसेवक आशिष धनवटे,दिपक चव्हाण,रवी पाटील, श्रीनिवास बिहाणी, मनोज लबडे उपस्थित होते. शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड म्हणाले, भारतीय जनता पक्षाची ओळख ही समर्पित भावनेन काम करणा-या कार्यकत्याचे मजबूत संघटन आहे. भारत देशाला सर्वोच्च स्थानावर नेण्यासाठी भाजपाने नेहमीच राष्ट्र प्रथम ही भूमिका घेवून काम केले.

विकसीत भारताच्या भविष्यासाठी प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली वाटचाल देशाच्या उज्वल भवितव्याचे द्योतक आहे असे सांगितले. यावेळी नगरसेवक संजय गांगड, संजय छल्लारे, रवीजी गुलाटी, राजेश अलग, मारुती बिंगले, सरचिटणीस विशाल अंभोरे, बंडूकुमार शिंदे, अरुण धर्मअधिकारी, मिलिंदकुमार साळवे, संजय कसलीवालं, शंकर चव्हाण, सुबोध शेवतेकर, प्रतीक वैद्य, अमोल शेटे, किरण कर्नावट, महेश सूळ, पृथ्वीराज चव्हाण, सचिन (मन्नू) धोत्रे, राहुल फुलारे, नवनाथ पवार, किरण पठारे, अवधूत शिंदे, सागर जाधव, श्रीयश झिरंगे, विशाल थोरात तसेच महिला मोर्चा व भारतीय जनता पार्टीचे सदस्य उपस्थित होते.

# कोपरगावच्या अनामिका आहेरची राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

## ड्रॉप रोबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचा झेंडा उंचावला; वैष्णवी लोखंडेला रौप्य

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : शहरासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी कामगिरी करत श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूलची विद्यार्थिनी अनामिका आहेर हिने राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक पटकावले आहे. उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे दि. २ ते ५ एप्रिल दरम्यान पार पडलेल्या १७व्या राष्ट्रीय ड्रॉप रोबॉल स्पर्धेत तिने ज्युनिअर गटात उत्कृष्ट खेळ सादर करत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व यशस्वी केले. या स्पर्धेत उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, दिल्ली आदी राज्यांतील शेकडो खेळाडूंनी सहभाग घेतला होता.



देशभरातील अव्वल खेळाडूंच्या उपस्थितीत स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली. अशा कठीण स्पर्धेत अनामिका आहेर हिने अचूक कौशल्य, वेगवान चपळता आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.




याच स्पर्धेत कोपरगावची वैष्णवी लोखंडे हिने सब-ज्युनिअर गटात रौप्यपदक मिळवत शहराच्या यशात भर घातली. दोन्ही खेळाडूंनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल तसेच कोपरगाव शहराचा नावलौकिक वाढला आहे.

सोमैया ट्रस्टचे अध्यक्ष समीर सोमैया, प्राचार्य के. एल. वाकचौरे, तसेच क्रीडा विभाग प्रमुख धनंजय देवकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या यशामागे प्रशिक्षक गणेश वाघ आणि गणेश मोरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

अनामिका आहेरच्या या यशामुळे भविष्यातील खेळाडूंना प्रेरणा मिळणार असून पुढील स्पर्धांमध्येही ती राज्यासाठी अधिक यश संपादन करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पाण्याचा अंदाज चुकला

## महाबळेश्वर येथे सोनेवाडीच्या तरुणाचा बुडून मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी येथील चि. संकेत विठ्ठल जाधव या २४ वर्षीय तरूणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. चि. संकेत यांच्या मृत्यूच्या बातमीने सोनेवाडी गावावर शोककळा पसरली . सोमवारी सकाळी साडेसात वाजता त्यांच्या पार्थिवावर सोनेवाडी अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. होम फर्स्ट फायनान्स मध्ये संकेत अहिल्यानगर येथे सावेडी शाखेत व्यवस्थापक म्हणून काम पाहत होता. महाराष्ट्र मध्ये असलेल्या सर्व शाखेमधील काम पाहत असणाऱ्या व्यवस्थापकांनी आपले टार्गेट पूर्ण केल्यानंतर त्यांना महाबळेश्वर येथे विरंगुळा व आनंद घेण्यासाठी फायनान्स कंपनीने टूरचे आयोजन केले होते.

मात्र संकेतच्या मृत्यूने या आनंदाचे होत्याचे नव्हते झाले. आपल्या ५६ मित्रासोबत संकेत शनिवारीच महाबळेश्वर गेला होता. एमबीए पूर्ण करून त्याने संगीत शास्त्रात देखील विशारद म्हणून नाव कमवले होते. रविवारी सकाळी सात वाजता आपल्या एका मित्रासोबत कोयना बॅक वॉटर च्या पाण्यात अंघोळ करण्यासाठी तो गेला. आणि तीच आंघोळ त्याची शेवटची ठरली. वानवली, सोळसी येथे बॅकवॉटरमध्ये पाण्याचा अंदाज न आल्यामुळे संकेत पाण्यात गेल्यानंतर कडेला आलाच नाही.

हे त्याच्या काठावर बसलेले मित्राला समजले. त्याने आरडाओरडा करत आपल्या सर्व मित्रांना या घटनेची माहिती दिली. स्थानिकांच्या मदतीने संकेतला बाहेर काढण्यात आले. महाबळेश्वर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मित्रांनी सोनेवाडी येथे दिली असता संकेतचे काका गोकुळ जाधव व भाऊ उध्वस्त जाधव महाबळेश्वर येथे तातडीने पोहोचले. शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल संकपाल, माजी उपसरपंच किशोर जावळे व मित्र परिवाराने पुढील तपास कामासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य केले. पोलीस निरीक्षक बापूसाहेब सांडभोर यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस हवालदार श्री कांबळे व श्री सय्यद यांना घटनास्थळी पाठवत सर्व कारवाई पूर्ण केली.



रविवारी नातेवाईकांच्या ताब्यात मृतदेह देण्यात आला. सोमवारी सकाळी सोनेवाडी येथे अंत्यसंस्कार झाले. अक्षय तृतीयेला आपल्या घराचे स्वप्न उराशी बाळगून ते पूर्ण करण्यासाठी संकेत प्रयत्न करत होता. आई वडील डोळ्यात तेल घालून संकेतला येण्याची वाट बघत होते मात्र या घटनेने सर्वच स्वप्नभंग झाली.

संकेत च्या पक्षात आजी दगुबाई जाधव,वडील विठ्ठल जाधव आई लिलाबाई जाधव,काका गोकुळ जाधव, भाऊ अनिकेत व उद्धव जाधव असा परिवार आहे. घराचे काम अक्षय तृतीयेला सुरू करायचे होते तेव्हा कंपनीच्या ट्रीपसाठी संकेत जाणार नव्हता. त्याने आपल्या वरिष्ठांना याबाबत सांगितले होते. मात्र संकेतचा स्वभाव मनमिळावू असल्याने व त्याचे गायन व संगीतात अभ्यास असल्याने त्याला वरिष्ठांनी आग्रह केला होता.

शनिवारी रात्री सगळ्यांना त्याने आनंद दिला मात्र रविवार हा त्याच्यासाठी शेवटचा दिवस ठरला.